www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार




मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले  उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड  कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर  निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील  सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ | अंक : 298 | शनिवार दि. 12 जुलै २०२५ | किंमत : 2 रु | पृष्ठ : ४

## दृष्य सत्य

### जनतेच्या नजरेतून शासनाच्या दरबारात

### शिवाजी पार्कजवळ कचऱ्याचा ढीग... स्वच्छतेला तडा!



प्रतिनिधी
मयुर प्रकाश धुरी

सेनापती बापट चौक, शिवाजी पार्क – गेल्या अनेक दिवसांपासून कचऱ्याचा मोठा ढीग नजरेआड नाही, पण प्रशासनाच्या दुर्लक्षात आहे. दादर चौपाटी, शाळा, रुग्णालय, मैदान, चैत्यभूमीकडे जाणाऱ्या नागरिकांना रोज दुर्गंधीतून वाट काढावी लागते!

**"स्वच्छ मुंबईचं स्वप्न. कचऱ्यात गाडलं जातंय!"**

**तातडीने स्वच्छता व्हावी, हीच नागरिकांची अपेक्षा!**

---



दैनिक युवक आधार – इयत्ता ५ वी शिष्यवृत्ती परीक्षा २०२५ चा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत कु. शरण्या युवराज म्हस्के हीने जिल्हा गुणवत्ता यादीत रायगड जिल्ह्यात ४० वा तर पनवेल तालुक्यात १५ वा क्रमांक प्राप्त केलेला असून तिला शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. शरण्या ही पनवेल शहरातील नामांकित अशा आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके या शाळेची विद्यार्थिनी असून. तिच्या यशात तिचे शिक्षक आणि पालक यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. या यशस्वी कामगिरीबद्दल शरण्याचे सर्व स्तरातून कौतुक! होत आहे

---

# ॲपवर आधारित बसेस, कार, बाईक टॅक्सी यांनी

## नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई करणार - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**दैनिक युवक आधार**
**मुंबई.संतोष पाटील**

राज्यातील बसेस, कार, बाईक टॅक्सी यांनी अप वर आधारित राज्यात व्यवसाय करताना कायदेशीर तत्वांचे पालन करणे आवश्यक आहे. खासगी वाहतूक व्यवसाय करणाऱ्या बसेस, कार, बाईक टॅक्सी यांनी नियमांचे उल्लघंन केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.



विधानभवन येथे अपवर आधारित बसेस, कार, बाईक टॅक्सीच्या विविध विषयासंदर्भातील बैठकीत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक बोलत होते. यावेळी परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यासह परिवहन विभागाचे इतर अधिकारी उपस्थित होते.

परिवहन मंत्री श्री. सरनाईक म्हणाले की, राज्य शासन नेहमीच या क्षेत्रात होणाऱ्या सकारात्मक बदलांसाठी नाविन्यपूर्ण उपक्रमांना पाठबळ देत आले आहे. कोणत्याही अपवर आधारित बसेस, कार, बाईक टॅक्सी यांनी कायदेशीर बाबींचे पालन करूनच वाहतूक व्यवसाय केला पाहिजे. राज्य शासनाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर शासन कडक कारवाई करेल. अपवर आधारित बसेस, कार, बाईक टॅक्सी यांनी केंद्र आणि राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन होणे अत्यंत आवश्यक आहे. अर्थात, शासनाने बनविलेले नियम हे प्रवाशांच्या हिताचे असल्यामुळे त्यांच्या हिताचे संरक्षण होणे तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन झाल्यास कडक कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

---

# स्वावलंबी शिक्षण जीवनातील महत्वाचा टप्पा - लोकनेते रामशेठ ठाकूर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद असा संदेश दिला. विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असतानाच उद्योग व्यवसायातून अर्थाजन केले पाहिजे अशी त्यांची विचारसरणी होती. त्यामुळे विद्यार्थिनींनीसुद्धा स्वावलंबी जीवनासाठी प्रयत्न केले पाहिजेत, हीच खरी कर्मवीरांना गुरुवंदना ठरेल असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन परिषदेचे ज्येष्ठ सदस्य माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केले. सोलापूर शहरातील सातरस्ता मोदीखाना येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात गुरुपौर्णिमेनिमित्त कार्यक्रम आयोजित



करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे प्रमुख मान्यवर म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाला संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य वाय.टी. देशमुख, प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे यांच्यासह कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, माहिती आणि तंत्रज्ञानाचे युग आहे. **पान २ वर**

---

# सरकारी वकील अशोक पोटे यांना भावपूर्ण निरोप

**दैनिक युवक आधार**
**किनवट प्रतिनिधी**
**विशाल भालेराव**

किनवट,दि.११ :किनवट न्यायालयातील सरकारी वकील अशोक पोटे यांची येथील आठ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर अकोला येथील न्यायालयात नुकतीच बदली झाली आहे.यानिमित्त त्यांना वकील संघातर्फे नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमात भावपूर्ण निरोप देण्यात आला.अध्यस्थानी दिवाणी **पान २ वर**




---

# उमरी तालुक्यातील सर्वच ग्रामपंचायत अंतर्गत घरकुल पात्र लाभधारकांसाठी जाहीर आव्हान

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड** - उंमरी तालुक्यातील सर्वच 58 ग्रामपंचायत अंतर्गत घरकुल पात्र लाभार्थ्यांना जाहीर आव्हान करण्यात येते की आपले घरकुल यादीत नाव आलेले आहे अशा पात्र लोकांनी उमरी पंचायत समिती सभागृहात ठरवून दिलेल्या तारखेस सकाळी दहा ते सहा वाजेपर्यंत आपल्याकडील आधार कार्ड अपलोड करण्यासाठी व तसेच आपल्याकडील पाणीपट्टी घर पावती




भरून नमुना नंबर आठ घेऊन उमरी पंचायत समिती सभागृहात उपस्थित रहावे असे आव्हान, उमरी गटविकास अधिकारी आरबडवार साहेब, यांनी ,नोडल अधिकारी ठरवून दिलेल्या लाभार्थ्यांना मार्गदर्शन करून कागदपत्र अपलोड करण्यासाठी सहकार्य करतील, प्रत्येक गावच्या ग्रामसेवकाच्या संपर्कात राहून आपले अमूल्य वेळ देऊन पंचायत समिती सभागृहा येथे आपले आधार कार्ड व नमुना नंबर आठ घेऊन आपली पाणीपट्टी घरपट्टी भरून नमुना नंबर आठ ग्रामसेवक समक्ष घेऊन उपस्थित रहावे, व शासनासह कार्य करावे गावातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या मंदिरावरील साऊंड द्वारे जाहीर आव्हान करून कळवावे व कोणीही घरकुला पासून वंचित राहू नये असे आव्हान प्रधानमंत्री घरकुल टप्पा क्रमांक दोन द्वारे कळविण्यात येत आहे पहिला टप्पा बळेगाव, बेलदारा ,हातणी, कौवडगाव, महाटी, बिजेगाव, हसा ,सिंगणापूर, कावलगुडा खुर्द, कावलगुडा बु, या गावातील घरकुल पात्र व्यक्तीने दिनांक 11 /07/ 25 रोजी दहा **पान २ वर**

---

# समाजसेवक तथा माजी नगरसेवक शिवाजी साहेबराव थोरवे म्हणजे समाजसेवेचा वाहता झराच होय.

## शेकडो नागरिक आणि विद्यार्थ्यांना वाटप केले मोफत शासकीय दाखले...

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

गेली अनेक वर्षे खांदा कॉलोनी येथील रहिवाशी असणारे आणि येथील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी धावून जाणारे समाजसेवक अशी ओळख असणारे व्यक्तिमत्व म्हणजे माजी नगरसेवक श्र. शिवाजी साहेबराव थोरवे होय. पनवेल मधील गजबजलेल्या खांदा कोलनीत सर्व धर्म सर्व जातीतील लोक राहत आहेत. मात्र या लोकांनाच आपले शासकीय दाखले, विध्यार्थ्यांच्या शाळेत लागणारे दाखले काढणे म्हणजे जिकरीचे काम असते. अनेक वेळा तहसील कार्यालय किंवा अन्य कार्यालयात हेलपाटे घातले तरी काम होत नाही. लोकांची हीच समस्या हेरून



माजी नगरसेवक शिवाजी साहेबराव थोरवे यांनी निशुल्क म्हणजे काहीही पैसे न घेता काम करायचे ठरवले. गोर गरीब जनतेची सेवा करायची त्यांच्या आई वडिलांनी समाजसेवेची दिलेली शिकवण ते नेहमी जपत आलेले आहेत. अशातच त्यांनी खांदा कॉलोनी येथे भगवा सप्ताह म्हणून १९जुन ते १९ जुलै असे ३० दिवस ३० कार्यक्रम राबवला आहे. नुकतेच त्यांनी खांदा कॉलनी तसेच पनवेल मधील लोकांना डोमेसाइल, उत्पनाचा दाखला, तसेच नॉन क्रिमीलेअर, तसेच इतर लोकांना लागणारे कुणाचे राशन कार्ड, जेष्ठ नागरिक, मतदार ओळखपत्र, कृषी कार्ड, पेन्शन फॉर्म, आभा कार्ड, आयुष्यमान हेल्थ कार्ड, ईश्रम कार्ड, पॅनकार्ड किंवा कुणाचे लायसन्स अगदी पैसे न घेता मोफत पद्धतीने ते करून देत आहेत. त्यामुळे येथील जनतेमध्ये आनंदाचे वातावरण आहे. असा समाज सेवक आमचा नगरसेवक असावा अशी चर्चा सध्या सर्वत्र ऐकण्यास मिळत आहे. आज कालच्या धकाधकीच्या दुनियेत कोण कुणाचा नाही? मात्र खांदा कॉलनी पनवेलकरांच्या मनात एक प्रामाणिक माणूस म्हणून माजी नागरसेवा तसेच समाजसेवक असलेले श्री. शिवाजी साहेबराव थोरात हेच आपला माणूस असे लोकांना आता वाटू लागले आहे. असा नगरसेवक पुन्हा आपल्याला मिळावा अशी चर्चा सध्या सर्वत्र पसरली आहे. सध्या शिवसेना शिंदे गटामध्ये ते खांदा कॉलनी शहर प्रमुख या पदावर असून मा. श्री रामदासशेवाळे साहेब यांचे ते खास निकटवर्तीय कार्यकर्ते आहेत. उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे साहेब यांचे ते कार्य जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी दिवस रात्र कार्यकत्यांना सोबत घेऊन ते करीत आहेत. तरी खांदा कॉलनी विभागातील सर्व नागरिकानी या मोफत दाखले वाटपाचा फायदा घ्यावा आणि त्यांना संपर्क करावा अशी विनंती त्यांनी केली आहे. शॉप नं. १, साई सिमरन को. ऑ. सोसायटी, सेक्टर १, खांदा कॉलोनी, पनवेल येथे त्यांचे कार्यालय असून मोबाईल क्रमांक ९३२१२२७०७० या क्रमांकावर संपर्क साधावा अशी त्यांनी जाहीर विनंति केली आहे.

---

# पोलादपूर-महाबळेश्वर (आंबेनळी घाट) दि.10 ते 14 जुलै पर्यंत

## सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद जिल्हाधिकाऱ्यांनी जारी केली अधिसूचना..

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधीः-सचिन पवार**
**माणगांव रायगड**

रायगडः- पोलादपूर महाबळेश्वर (आंबेनळी घाट) रस्त्यावर आलेले दगड, गोटे व माती काढण्याच्या कामाकरिता 04 दिवस लागणार असल्याने दि.10 जुलै ते दि.14 जुलै 2025 रोजीपर्यंत सदर रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांच्या वाहतूकीसाठी पूर्णतः बंद करण्याची अधिसूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केली आहे.

सदर कालावधीकरीता रायगड जिल्हा हद्दीमधील वाहतूक सर्व प्रकारच्या वाहतूकीकरीता बंद करण्याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षक, रायगड व तहसिलदार पोलादपूर यांनी केलेल्या विनंतीनुसार दि.10 जुलै ते दि.14 जुलै 2025 या कालावधीत सदर सर्व प्रकारच्या वाहनांच्या वाहतूकीसाठी बंद करण्याबबात जिल्हाधिकारी यांची खात्री झाली आहे.



त्यानुसार नागरिकांनी सदर कालावधीत पर्यायी मार्ग म्हणून पोलादपूर–माणगाव ताम्हाणी मार्गे पुणे–सातारा व पोलादपूर–चिपळूण–पाटण–सातारा–कोल्हापूर असा मार्ग वापरण्याची शिफारस करण्यात आली आहे.

# पूर्वीचा जात पुरावा बघून जात प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे गोर सेनेची तहसीलदारांकडे मागणी

**दैनिक युवक आधार**
**दिग्रस प्रतिनिधी**
**उमेश साखरकर**

महाराष्ट्रात बंजारा समाज हा विमुक्त जाती (अ) प्रवर्गात समाविष्ट आहे. बंजारा समाज हा मोठ्या प्रमाणात ग्रामीण व दुर्गम भागात वास्तव्यास आहे. मागील अनेक वर्षांपासून बोगस कागदपत्रांचा आधार घेऊन मोठ्या प्रमाणात विमुक्त जाती (अ) या प्रवर्गात राजपूत समाज, छप्परबंद समाज बोगस घुसखोरी करीत आहे या समाजातील काही लोकांवर गुन्हे दाखल झाले आहे व काहीवर न्यायालयीन खटले चालू आहे. जात प्रमाणपत्र निर्गमित करताना मानीव दि. २१ नोव्हेंबर १९६१



च्या अगोदरचा जात संबंधित पुरावा बघून जात प्रमाणपत्र निर्गमित करणे अनिवार्य आहे आणि २००० कायदा, २०१२ अधिनियम- ५ (८), ८ (इ), (एफ) नुसार व सर्वोच्च न्यायालय निकालानुसार दर महिन्यात निर्गमित केलेल्या जात प्रमाणपत्राची यादी प्रसारित करणे आवश्यक आहे. जेणेकरून आक्षेप घेण्यास सोपे होईल. परंतु असे होताना दिसून येत नाही. यामुळे खरे लाभार्थी आरक्षणापासून वंचित होत आहे. सबब सदर बाब कायद्यानुसार अत्यंत गंभीर आहे. विमुक्त जाती अ प्रवर्गातील जात प्रमाणपत्र निर्गमित करताना मानवी दिनांक २१ नोव्हेंबर १९६१ च्या अगोदरचा जात संबंधित पुरावा बघूनच जात प्रमाणपत्र देण्यात यावे आणि दर महिन्याला निर्गमित केलेल्या जात प्रमाणपत्राची यादी प्रसारित करण्यात यावी. त्याबाबत जर आमचा आक्षेप असेल तर सुनावणी होऊन सखोल चौकशी करण्यात यावी. एखादा उमेदवाराने रक्त नाते संबंधित जात वैधता प्रमाणपत्र दाखवून प्रमाणपत्रासाठी अर्ज करत असेल तर २९१७ अधिनियम मध्ये स्पष्ट नमूद केले आहे की, जात वैधता प्रमाणपत्राच्या आधारावर एखाद्या व्यक्तीची जात शाबीत होत नाही. त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये १९६१ च्या आधी संबंधित पुरावा अनिवार्य आहे. सर्व तालुक्यांमध्ये जात प्रमाणपत्र काढण्याची मोहीम चालू आहे. तरी आपण आपल्या स्तरावरून कायदा २००१, अधिसूचना २०१२ यांचे पालन करून मूळ विमुक्त जातीमधील उमेदवारांना न्याय द्यावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनावर गोरसेना तालुकाध्यक्ष सुभाष चव्हाण, राहुल राठोड, अनिल राठोड, बलदेव चव्हाण, पवन पवार, किरण चव्हाण, जय चव्हाण, शिवनंद राठोड, राजू राठोड, दिनेश राठोड, के. बी. राठोड, नामदेव जाधव यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## सरकारी वकील अशोक पोटे यांना भावपूर्ण निरोप

**पान १ वरून** न्यायाधीश पी.एम.मानें हे होते,तर प्रमुख पाहुणे म्हणून सहदिवाणी न्यायाधीश के.एस.मेंढे हे उपस्थित होते. यावेळी वकील संघातर्फे जेष्ठ वकील के.एस.काजी यांनी अशोक पोटे यांना पुष्पहार घालून,शाल पांघरुन व पुष्पगुच्छ देऊन भावपूर्ण सत्कार केला. यावेळी सर्व वकीलांच्या वतीने प्रातिनिधिक स्वरूपात अड.दिलिप काळे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या व पुढील वाटचालीसाठी अशोक पोटे यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वकील संघाचे उपाध्यक्ष अड.टेकसिंग चव्हाण, सचिव अड.माझ बडगुजर,सहसचिव अड.मुसळे, कोषाध्यक्ष अड.सम्राट सर्पे यांनी पुढाकार घेतला.कार्यक्रमास वकील,न्यायालयीन कर्मचारी,पक्षकार यांची उपस्थिती होती.

## स्वावलंबी शिक्षण जीवनातील महत्वाचा टप्पा - लोकनेते रामशेठ ठाकूर

**पान १ वरून** त्यामुळे उद्योग व्यवसायामध्ये गुणवत्ता दाखविण्याची संधी प्राप्त झाली आहे. दर्जेदार उत्पादनास मागणी आहे. म्हणून विद्यार्थिनींनी मध्यम व लघु उद्योग व्यवसायातून अर्थाजन केल्यास त्यांचा भविष्यकाळ उज्वल होईल असे सांगितले तर प्राचार्य डॉक्टर सुरेश ढेरे यांनी आपल्या प्रास्ताविकातून महाविद्यालयाच्या उपक्रमांची माहिती दिली. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी महाविद्यालयाच्या अत्याधुनिक जयकुमारजी पाटील कौशल्य विकास केंद्रात कार्यान्वित असलेल्या ब्युटी पार्लर, फॅशन डिझाईन, फूड प्रोसेसिंग, इंग्लिश स्पिकिंग, संगणकाचे कोर्सेस, योगा सेंटर, कार ड्रायव्हिंग, पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण, टॅली, शेअर मार्केटिंग, स्पर्धा परीक्षा, बँकिंग परीक्षा या उपक्रमांचे कौतुक केले. दरम्यान संस्थेच्या मध्य विभागाचे कार्याध्यक्ष संजीव पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार महाविद्यालयाच्या परिसरात मुलींसाठी अद्यायावत वसतिगृह साकारण्यात येणार असल्याचे प्राचार्य डॉक्टर सुरेश ढेरे यांनी सांगितले. त्यावेळी आपल्याद्वारे यथाशक्ती योगदान दिले जाईल असे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले.

## उमरी तालुक्यातील सर्वच ग्रामपंचायत अंतर्गत घरकुल पात्र लाभधारकांसाठी जाहीर आव्हान

**पान १ वरून** वाजता पंचायत समिती सभागृहात उपस्थित रहावे तसेच दुसरा टप्पा.. वाघलवाडा ,गोळेगाव, चिंचाळा ,बोळसा ,करकाळा, बोरजुनी, निमटेक ,नाकठाना बुद्रुक ,नागठाणा खुर्द ,धानोरा ,या पात्र लाभार्थ्यांनी दिनांक 14/07/25 रोजी पंचायत समिती कार्यालय सभागृहात उपस्थित राहावे, टप्पा क्रमांक तीन वाघाळा, गोळेगाव, मंडळा राम खडक, हूंडा, हिरडगाव, तुराठी, बोथी , सावरगाव,कला, बितनाळ, गणपुर ,या पात्र लाभार्थ्यांनी 15/07 /25 रोजी सकाळी दहा वाजता उपस्थित राहावे, टप्पा क्रमांक चार सोमठाणा, मोखंडी, जिरोना, शिरूर, अब्दुल्लापूरवाडी,इज्जतगाव पटी,बर्डी,आमदापुर,मनुर, तळेगाव, कारला, या लाभार्थ्यांनी दिनांक 16/07/25 रोजी उमरी पंचायत समिती सभागृहात उपस्थित राहावे टप्पा क्रमांक पाच पळसगाव , ढोलउमरी ,ईश्वर नगर, अस्वलधारी ,गोरटा, जामगाव, शेलगाव , सिंधी, शिवणगाव, वसंतनगर ,या लाभार्थ्यांनी दिनांक 17/07/25 रोजी उमरी पंचायत समिती येथे उपस्थित रहावे तसेच टप्पा क्रमांक सहा सावरगाव द भायेगाव, ईळेगाव, राहटी ,कुदळा, हुंडा, हंगीरगा, बोळसा, या लाभार्थ्यांनी दिनांक 18/07/25 रोजी वरील प्रमाणे आधार कार्ड नमुना नंबर आठ घेऊन आपले कागदपत्रासह पंचायत समिती सभागृहात उपस्थित राहावे व कोणीही दिरंगाई करू नये दिरंगाई केल्यास सर्वस्वी जबाबदारी आपल्यावर राहील असे शासनाचे जाहीर आवाहन करून आपण लाभार्थ्यांनी नोंद घ्यावी ही नम्र विनंती

## वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी



**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

निफाड न्यायमूर्ती रानडे विद्या प्रसारक मंडळ संचलित वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूल येथे गुरुपौर्णिमा निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी सरस्वती व वेध व्यासांच्या प्रतिमेचे पूजन करून विद्यालयातील सर्व शिक्षकांचे बाळ गोपाळांनी औक्षण करून गुरुंच्या चरणी नतमस्तक झाले व गुरुंचे आशीर्वाद घेतले यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी गुरु विषयी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात इयत्ता पहिली ते नववीच्या मुलांची वकृत्व स्पर्धा घेण्यात आली. तसेच नर्सरी ते दहावी मुलांनी सहभाग नोंदविला.

प्राचार्य सौ पल्लवी सानप यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला . शाळेच्या मुख्याध्यापिका पल्लवी सानप मॅडम यांनी विद्यार्थ्यांना गुरुपौर्णिमा का साजरी केली जाते याचे महत्त्व पटवून दिले व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि.दा.व्यवहारे , संस्थेचे विश्वस्त अँड आप्पासाहेब उगांवकर , रतन पाटील वडघुले, किरण कापसे ,राजेंद्र राठी , अँड दिलीप वाघवकर, राजेश सोनी, प्रभाकर कुयटे, मधुकर राऊत विश्वास कराड ,नरेंद्र नांदे,
यांनी सर्व विश्वस्तांनी सर्व शिक्षकांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.

## आंध्र बस स्टॅन्ड ते बाळापूरच्या वेशीपर्यंत चा रस्ता बनला काळोख्याचे माहेरघर

### धर्माबाद नगर प्रशासनाचा कारभार म्हणजे दिव्याखाली अंधार

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी**
**: गिरमाजी सुर्यकार**

धर्माबाद येथील शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक ते बाळापूर वेशीपर्यंत गेल्या वर्षी नवीन रस्ता बनवण्यात आला आणि या रस्त्यावर दोन्ही बाजूने नगरपालिकेच्या वतीने लाईट लावण्यात आले परंतु हे लाईट काही दिवस चालू होते पण गेल्या आठ दिवसापासून या रस्त्यावर काळोखच काळोख आहे. रस्त्याचे दोन्ही साईडचे लाईट बंद असल्याने बाळापुर नगरीमध्ये रात्रीला जाणाऱ्या नागरिकांना नाहक त्रास होत आहे. कामगार महिला काम करून रात्री घरी जाताना पूर्णपणे अंधार असल्याने त्यांच्या भीतीचे



वातावरण निर्माण झाले आहे. तसेच शाळेच्या विद्यार्थ्यांनी ह्या रस्त्याने कोचिंग क्लास संपल्याने सायकलने जात असतात. रस्त्यावर पूर्णपणे काळोख असल्याने अपघाताचे प्रमाण वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच पावसाळ्याचे दिवस असल्याने साप, विंचू असे अनेक विषारी कीटकनाशक बाहेर येत आहेत. यामुळे नागरिकांना जीवितहानी पोहोचण्याची शक्यता असल्याने झोपेचे सोंग घेतलेले नगर प्रशासन आता तरी जागा होईल का? असा संतप्त सवाल नागरिकांतून होत आहे. तसेच बाळापूर मधील आजी-माजी व भावी नगरसेवक या समस्या कडे लक्ष देऊन रस्त्याचे लाईट लवकर चालू करण्यात यावे अशी विनंती बाळापुर वासियातर्फे करण्यात येत आहे.

## रिसोड शहरात मोहिमे अंतर्गत अल्पवयीन वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई.!

### (जिल्हा वाहतूक शाखा ॲक्शन मोडवर.)

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**



रिसोड पोलीस आणि जिल्हा वाहतूक पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने मोहीम राबवून एकूण - 41 केसेस करण्यात आल्या असून एकूण-74000 रूपये दंड वसुल करण्यात आला आहे. त्यामध्ये 18 वर्ष खालील मुलांना पालकांनी वाहन चालविण्यास दिलेल्याने एकूण -11 केसेAस करून दंड -55,000/- रूपये दंड वसुल करण्यात आला आहे. तसेच इतर एकूण -30 केसेस करून 19,000/- रूपये दंड वसुल करण्यात आला आहे. ही मोहीम यापुढेही अशीच सुरु राहणार असून पालकांनी सावधानता बाळगावी आणि लहान मुलांना वाहने चालविण्यास देऊ नये.असे कृत्य केल्यास कमीत कमी 5000/- दंड होईल याची नोंद घ्यावी. तसेच पालकांनी आपली मुले शाळेत पाठविताना त्या वाहनात मर्यादे पेक्षा जास्त मुले बसवत असतील तर त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. दुचाकी वर प्रवास करतांना हेल्मेट वापरावे, वेगावर मर्यादा ठेवावी. आपल्या शहरात व ग्रामीण भागात अपघातास आळा बसावावा तसेच सामान्य जनतेला विनाकारण वाहतुकीचा त्रास होऊ नये यासाठी रिसोड पोलिसांकडून आवाहन करण्यात येत आहे.सदर कारवाई .पोलीस अधीक्षक अनुज तारे सा. मा.अपर पोलीस अधीक्षक लता फड , मा. सहा. पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवालसा. यांचे मार्गदर्शनात रिसोड चे ठाणेदार रामेश्वर चव्हाण व जिल्हा वाहतूक शाखेचे प्रमुख पोलीस निरीक्षक संतोष शेळके यांचे नेतृत्वात वाहतूक शाखेचे पोहेकॉ. किशोर पवार, मनोज वानखेडे पो अंमलदार- सुधाकर सोनहर, शिवाजी केंद्रे, नारायण काकडे, तेजराव घुगे, यांनी केली आहे.

# महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर उगवता सूर्य आमदार विक्रांत पाटील

**लेख : अजय पांडुरंग कापरे**
**महाराष्ट्र संपादक दैनिक युवक आधार**

महाराष्ट्र हे नाव उच्चारले तरी डोळ्यासमोर विदर्भ ते मुंबई ,खानदेश ते कोकण हा समृद्ध प्रदेश उभा राहतो , सह्याद्री च्या कडा कापऱ्या , सातपुडा ,बालाघाटचे डोंगर , कृष्णा कोयना भद्रा गोदावरी अश्या विविध छोट्या मोठ्या नद्यांच्या तीरावर वसलेला समृद्ध महाराष्ट्र . शुर - वीरांची संतांची विचारवंतांची आणि अभिनयाच्या वेलीवर फुलणाऱ्या कलावंतांची भूमी म्हणजे महाराष्ट्र . या भूमीने भारत देशाल अनेक थोर सुपुत्र , सुपुत्री दिल्या अनेक यशस्वी लोकांनी या राज्याचे नेतृत्व केले . महाराष्ट्राची भरभराट आणि विकास करायचा असेल तर त्या साठी योग्य नेतृत्व या राज्याला लाभले पाहिजे .आज राज्यातील राजकारण गढुळ झाले आहे तरी सुद्धा काही युवा नेतृत्व हे गढूळ पण दूर करण्यासाठी पाणनीवळी चे काम करत आहेत स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या पासून चालत आलेला सुसंकृत आणि सभ्यतेचा राजकीय वारसा ते पुढे घेऊन जाण्याचा पर्यत्न करतात .त्यातीलच एक नाव म्हणजे विधानपरिषद आमदार विक्रांत पाटील . आपल्या 8 महिन्याच्या आमदारकीच्या काळात ते महाराष्ट्रातील तरुणांचे आवडते नेतृत्व झाले आहे .पक्ष संघटना हा भेदभाव विसरून सगळेच जण त्यांचे चाहते आहेत . गेल्या तीन अधिवेशनात पनवेल आणि महाराष्ट्रातील



सामान्य जनतेचे मूलभूत प्रश्न ते सभागृहात मांडत आहेत .आणि त्याचा पाठपुरावा करून ते प्रश्न सोडवून घेत आहेत .प्रत्येक प्रश्नाची मांडणी अत्यंत अभ्यासपूर्ण असते . त्यांच्या वडिलांकडून बाळासाहेब पाटील यांच्या कडून लाभलेला सुसंस्कृतपणा ते पुढे घेऊन जात आहेत . गेले 18 वर्ष त्यांनी स्वतःला पक्ष संघटन कार्यात वाहून घेतले आहे .पायाला भिंगरी लाऊन कितेक वेळा संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला आहे .प्रतिकूल परिस्थिती मध्ये सत्ता नसताना सुद्धा महाराष्ट्रातील तरुणांना त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या सोबत जोडले आहे . 2025 विधान सभेत पक्षाने खूप मोठी जबाबदारी त्यांच्यावर दिली होती .त्यांनी त्याच ताकदीने ती जबाबदारी पार पाडली . आपल्या पदाचा कसलाच बडेजाव पना त्यांनी केला नाही .ओळखीचे असो की अनोळखी लोकांच्या गर्दीत ते सहज मिसळून जातात आणि सर्वांना आपलेसे करतात . एक सर्वसामान्य कार्यकर्ता ,ते आज भारतीय जनता पक्षाचे महासचिव ही झेप घेऊन त्यांनी सर्वसामान्य घरातील तरुणांपुढे एक आदर्श निर्माण केले आहे . पुढील काही वर्षात विक्रांत पाटील नावाची जादू संपूर्ण भर होणार आहे . सामान्य जनतेच्या प्रश्नाला वाचा फोडणारे नेतृत्व त्यांच्या रूपाने या महाराष्ट्राला लाभले आहे . या राजकीय सूर्याचा नुकताच उदय झाला आहे .त्याच्या कोवळ्या किरणातच त्याच्या प्रखरतेची झलक दिसत आहे . अश्या या लाडक्या नेतृत्वाचा आज वाढदिवस आहे .
आमदार विक्रांत पाटील यांना दैनिक युवक आधार आणि युथ कॉर्नर कडून वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

**कामगिरी**

2017 पनवेल महानगरपालिकेत नगरसेवक नंतर पनवेल चे उपमहापौर म्हणून त्यांनी उत्तम काम केले आपल्या कामाच्या माध्यमातून पनवेल च्या जनतेचा विश्वास जिंकला. त्या नंतर पक्षाने त्यांना युवा मोर्चा चे प्रदेश अध्यक्ष बनवले तिथे हि त्यांनी आपल्या कामाची छाप सोडली आत्ता पर्यंतचे सगळ्यात ऍक्टिव्ह प्रदेश अध्यक्ष युवा मोर्चा ला मिळाले. सी एम चषक या त्यांच्या विविध क्रीडा स्पर्धा संकल्पनेने संपूर्ण महाराष्ट्रातील युवक आणि शालेय विद्यार्थी मुख्यमंत्र्यांन सोबत जोडले गेले . त्यानंतर पक्षा ने त्यांना प्रदेश महासचिव /महामंत्री बनवले तिथे हि त्यांनी आपल्या संघटन कौशल्याने दिल्लीतील पक्ष श्रेष्ठींचे मन जिंकले

## जिल्हा कृषी अधिकाऱ्याच्या टीमने केली कोळदरा येथे नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प अंतर्गत शेतीशाळा व जलताराची पाहणी.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

मालेगांव तालुक्यातील ग्राम कोळदरा हे शंभर टक्के आदिवासी बहुल गांव असून या वेळी वाशिम जिल्हाधिकारी कार्यालय मार्फत घेण्यात आलेल्या वत्सगुल्म भुजल पुनर्भरण स्पर्धा मध्ये गावाने जिल्हातून दुसरा क्रमांक पटकावला. त्यामुळे गावातील जलताराची पाहणी करण्याकरिता जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी



अरिफ शहा साहेब यांच्यासह प्रकल्प संचालक आत्मा अनिसा महाबळे व परीक्षावधीन जिल्हा अधिकारी आकाश वर्मा साहेब हे सुद्धा होते.तसेच तालुका कृषि अधिकारी कैलास देवकर यांचासह मंडळ कृषी अधिकारी प्राजक्ता कुचेकर, उपकृषी अधिकारी मिलिंद कांबळे व सहायक कृषी अधिकारी देवानंद रणवीर होते.गावाच्या प्रथम नागरिक सरपंच सौ रेश्मा हांडे यांच्या सह ग्रामपंचायत अधिकारी सुरेश राऊत यांची सुद्धा या कार्यक्रमाला विशेष उपस्थीती होती. कार्यक्रमाची सुरुवात गावातील सर्व शेतकऱ्यांनी प्रतिज्ञा घेऊन केली व त्यानंतर गावातील सोयाबीन उत्पादक महिला यांची सुद्धा कार्यशाळा घेऊन त्यांना सोयाबीन पिकावरील मित्र किडी व शत्रू किडीची माहिती शेतकऱ्यांना देऊन त्यांची ओळख पटवून दिली व सोयाबीन पिकाचे योग्य संगोपन कसे करायचे याची इत्यंभूत माहिती कृषी विभागाच्या वतीने दिली. त्याकरिता शेताच्या बांधावर जाऊन व प्रत्यक्ष पाहणी करून त्यांना सखोल मार्गदर्शन करण्यात आली.यावेळी गावातील शेतकरी बांधवा पैकी सोनाजी देवकर,ज्ञानदेव धंदरे,उकडा करवते,मारोती करवते, मनोहर भोकरे,संतोष देवकर,सुरेश जावळे, लक्ष्मण करवते,अजिंक्य मेडशीकर सह महिला पैकी ज्योती धदरे, यांच्यासह परिसरातील शेतकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## रविवारी स्व. चांगू काना ठाकूर यांचा पुण्यस्मरण दिन व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी मधील चांगू काना ठाकूर (सीकेटी स्वायत्त) महाविद्यालयात संस्थेचे प्रेरणास्थान स्व. चांगू काना ठाकूर यांचा पुण्यस्मरण दिन व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा रविवारी (दि. १३) सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रसाद महादेव कारंडे आणि आमदार तथा कार्यकारी मंडळाचे सदस्य प्रशांत ठाकूर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमावेळी संस्थेचे



अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य संजय भगत, अनिल भगत, माजी उपमहापौर सीता पाटील, माजी नगरसेवक नितीन पाटील, मनोहर म्हात्रे, एकनाथ गायकवाड, माजी नगरसेविका हेमलता म्हात्रे व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती या सोहळ्याला लाभणार आहे . प्राचार्य डॉ. एस.के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. आर.डी. म्हात्रे, डॉ. एस.एन. पारकाळे, प्रा. डॉ. बी. डी. आघव आदींनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि संस्थापकांच्या स्मृतींचा सन्मान करणारा हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

**daily YUVAK ADHAR** Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# न्यू इंग्लिश स्कूल चांदोरी विद्यालयात पालक शिक्षक संघाची स्थापना

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

**चांदोरी** : येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल चांदोरी विद्यालयात आज गुरुवार दिनांक 10 जुलै 2025 रोजी सकाळी ठीक दहा वाजता विद्यालयाच्या पालक शिक्षक संघाची पहिली सहविचार सभा अतिशय उत्साहात संपन्न झाली. याप्रसंगी आपल्या अध्यक्षीय मनोगतात विद्यालयाचे प्राचार्य भाऊसाहेब कापडणीस यांनी विद्यालयात राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची उपस्थितांना माहिती करून दिली. तसेच यावेळी बोलताना ते म्हणाले,"विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ हाच आमच्या न्यू इंग्लिश स्कूल चांदोरी विद्यालयाचा ध्यास आहे." शैक्षणिक वर्ष सन 2025 ; 26 मध्ये विद्यालयाच्या विविध स्पर्धा परीक्षांच्या निकालात गेल्या वर्षाच्या तुलनेत निश्चितच भर पडणार आहे त्यामुळे विद्यालयाची गुणवत्ता ही वाढणार आहे असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तत्पूर्वी सकाळी ठीक दहा वाजता उपस्थित पालकांच्या समवेत रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील तसेच गुरुपौर्णिमा असल्यामुळे महर्षी व्यास यांच्या प्रतिमांचे पूजन करून मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. याप्रसंगी जवळपास 300 ते 350 पालक उपस्थित होते. विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक बापू दिवे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, त्यांनी यावेळी विद्यालयात सुरू असलेल्या विविध उपक्रमांची ही माहिती दिली तसेच गतवर्षीच्या इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या निकालाचे वाचन केले. तसेच उपस्थित पालकांमधून लोकशाही पद्धतीने पालक शिक्षक संघ स्थापन



करून घेतला. विद्यालयाचे पर्यवेक्षक व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर डॉ जयवंत ठाकरे यांनी प्रास्ताविक सादर केले. विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका सौ संगीता भदाणे यांनी देखील यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यालयाची पर्यवेक्षक मनोज महाजन यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शिस्तीचा प्रश्न उपस्थित केला. शिक्षकांच्या मनोगतनंतर पालकांनी आपल्या काही समस्या तसेच विद्यालयात चाललेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे भरभरून कौतुक केले.

विद्यालयाचे उपशिक्षक घनश्याम मोरे यांनी नुकत्याच जाहीर झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित केला. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यालयाच्या 14 गुणवत्ता शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी विद्यालयाच्या माजी शिक्षिका वैशाली पवार यांनी प्रत्येक विद्यार्थ्याला शंभर रुपये बक्षीस जाहीर केले होते त्याचेही यावेळी वाटप झाले. शिष्यवृत्ती विभागाच्या विभाग प्रमुख वैशालीताई टर्ले, कामेश जोपळे, तसेच सर्व मार्गदर्शक शिक्षकांचा सत्कार घेण्यात आला. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धेमध्ये विद्यालयाने तालुक्यात द्वितीय क्रमांक मिळवून एक लाख रुपयांचे बक्षीस मिळवल्याबद्दल विभाग प्रमुख घनश्याम मोरे, आकाश टरले, विशाल गोसावी, यांचाही सत्कार झाला. तसेच तत्कालीन प्रभारी प्राचार्य अंबादास चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली शिष्यवृत्ती परीक्षेचा उत्कृष्ट निकाल व विद्यालयाला मिळालेले एक लाख रुपयांचे पारितोषिक यामुळे मान्यवरांच्या हस्ते चौधरी सरांचा सत्कार घेण्यात आला. नवनिर्वाचित पालक शिक्षक संघाचे सर्व सदस्य तसेच शाळा व्यवस्थापन समितीतील सर्व सदस्य,शालेय प्रशासनातील सर्व पदाधिकारी आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत विद्यालयात वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे नियोजन विद्यालयाचे जेष्ठ उपशिक्षक राजेंद्र बगाव यांनी केले.

शैक्षणिक वर्ष सन 2025 मध्ये साठी लोकशाही पद्धतीने निवडण्यात आलेल्या सदस्यांमधून उपाध्यक्षपदी भागवतराव गामणे यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच सदस्य म्हणून सौ मनीषा गडाख, शांताराम खालकर, सो मोनाली ताई डबे, ज्ञानेश्वर गजिराम, सौ जयश्री दाते, सौ रोहिणी कांगणे या पालक सदस्यांची निवड करण्यात आली. पालक शिक्षक संघाचे सचिव म्हणून विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक बापू दिवे सर यांची निवड झाली. पालक शिक्षक संघाच्या सहविचार सभेचा कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांकडून गुरुपौर्णिमेनिमित्त विद्यालयातील सर्व शिक्षक वृंदांचा ऋणनिर्देश व्यक्त करण्यात आला. याप्रसंगी दहावीच्या विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षक वृंदांना स्नेह वस्त्र आणि एक पेन भेट स्वरूपात दिला. यश शिरसाठ, स्वरा शिंदे, राजश्री टरले यासारख्या विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त आपले मनोगत व्यक्त केले. विद्यालयाची उपशिक्षक दिवे सर यांनी गुरु आणि गुरु पौर्णिमा यांचा संबंध विशद केला. विद्यालयाचे प्राचार्य भाऊसाहेब कापडणीस यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. उपमुख्याध्यापिका सौ भदाणे मॅडम यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त अध्यक्ष मनोगतात गुरूंची जीवनातील स्थान या विषयावर आपले विचार मांडले.

विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक विष्णू कोरडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## कै.लक्ष्मीबाई विठ्ठल मोदलवाड यांचे दु:खद निधन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनीधी/माधवकाईतवाडबोरगडीकर**



नांदेड:नायगाव तालुक्यातील कहाळा (खु )येथील रहिवाशी एक कष्टकरी व प्रामाणिक म्हणून परिसरात परिचय असलेले 2(दोन) भावांचे मोदलवाड कुटूंब. कुटुंब प्रमुख अमृता मोदलवाड (मा.पं.समिती सदस्य) व लहान भाऊ विठ्ठल मोदलवाड सख्खे भाऊ.

विठ्ठल मोदलवाड यांना दोन पत्नी एक इंदरबाई आणि दुसरी लक्ष्मीबाई परंतु अचानक लक्ष्मीबाई यांना पॅरलेसेस अचानक झाल्यामुळे त्यांना वारंवार अटॅंक येते होते. खुप दिवस त्या आजारी होत्या त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार चालु होते. परंतु नियती पुढे कोणाचें काही चालत नाही म्हणतात, त्याप्रमाणे लक्ष्मीबाई यांना दिनांक 10/07/2025 रोजी पहाटे देवाज्ञा झाली. त्यांच्या पश्चात पती २मुले,२मुली,सुना नातवंडे असा मोठा परिवार आहेत, त्या गोल्ला गोल्लेवार यादव समाज नांदेड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख श्री सटवाजी विठ्ठल मोदलवाड यांच्या छोट्या आई होत्या.

यावेळी त्यांच्या अंत्ययाविधीला मा.शिक्षण सभापती जि.प.नांदेड मा.श्री शिवराज पाटील होटाळकर,गोल्ला गोल्लेवार यादव समाज महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री नामदेवराव आयलवाड सह आप्तआष्टिय पाहुणे,परिसरातील प्रतिष्ठीत,राजकीय,शेक्षणीक, सामाजीक क्षेत्रातील नागरिक यांची अंत्यविधी साठी उपस्थिती होती..

## धरण क्षेत्रातील अतिक्रमणे काढण्यासाठी ड्रोनद्वारे सर्वेक्षण- जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**दैनिक युवक आधार**
**मुंबई,प्रतिनिधी**
**संतोष पाटील**

लघु सिंचन प्रकल्पांमध्ये साचलेला गाळ काढण्यासाठी मृद व जलसंधारण विभागामार्फत 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' ही योजना राबविण्यात येते. याचबरोबर धरण क्षेत्रातील अतिक्रमणे काढण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला असून याचे ड्रोनच्या माध्यमातून सर्वेक्षण करण्यात येत असल्याची माहिती जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधान परिषदेत दिली. सदस्य डॉ. मनीषा कायंदे यांनी तलावांच्या स्वच्छतेसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाचे उत्तर देताना मंत्री श्री. विखे-पाटील बोलत होते. यावेळी झालेल्या चर्चेत सदस्य शशिकांत शिंदे यांनी सहभाग घेतला. मंत्री विखे पाटील बोलताना सांगितले की,लोकसहभागातून राबविण्यात येणाऱ्या 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेंतर्गत शेतकऱ्यांना गाळ वाहून नेण्यासाठी १५ हजार रुपयांच्या मर्यादेत प्रति घनमीटर ३५.७५ रुपयांचा निधी जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत दिला जातो. गाळ काढण्यासाठी यांत्रिकी विभागाकडील यंत्रसामग्रीचा प्रभावी वापर करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## ओम गुरुदेव रेल्वे प्रवासी भजन मंडळ,नालासोपारा मोरेगाव ( रजि.) तर्फे भव्य दिव्य दिंडी सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**मुंबई - ( केतन भोज )**



ओम गुरुदेव रेल्वे प्रवासी भजन मंडळ, नालासोपारा मोरेगाव ( रजि.) तर्फे भव्य दिव्य दिंडी सोहळा दरवर्षी प्रमाणे याही वर्षी रविवारी ( ६ जून ) रोजी अत्यंत भक्तिभावाने,हरिनामाच्या गजरात आणि टाळ-मृदुंगाच्या निनादात संपन्न झाला.सकाळी ८:४० विरार लोकलमध्ये पूजन करून हरिनामाचा गजरात दिंडीला शुभारंभ करण्यात आला.दिंडीने भक्तिरसात चिंब होऊन चर्चगेट स्टेशन गाठले.संत सेवा समितीचे कार्यकारी पदाधिकारी यांनी प्रेमपूर्वक स्वागत केले.

तिथे जणू काही प्रतीक पंढरपूरच उतरले होते,असा आनंदमय सोहळा सर्व भाविकांनी अनुभवला.

दुपारी १२ वा.दहिसर येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आगमन झाले.यावेळी मंदिर समितीनेही भव्य स्वागत केले.रिंगणात भक्तिमय गजर, टाळ- मृदुंगाचा गगनभेदी निनाद, भजनांचे सुमधुर सूर आणि भक्तांची एकरूपता या साऱ्या वातावरणात दिंडी न्हालेली होती.

शेवटी शिवमंदिर, मोरेगाव येथे भजन गजरात दिंडीची भव्य सांगता कार्यक्रम पार पडला.या पवित्र सोहळ्याला सुनील कदम,गणेश पवार,शैलेश मोडक,अंकुश सावंत,दिंडी प्रमुख - शरद जाधव,विकास कोळेकर,श्रीरंग कोळेकर तुकाराम सावंत,दिपक सावंत,शंकर नेवगे, मलेश जाधव, निलेश खरपुडे, दिपक पाटील, जनार्दन,अजय,नवनाथ बाईंग,आनंदा मत्रे वैभव कदम गणेश अनुते सुनिल मोंडे,शंकर मेते,महिला सदस्य - सारिका कदम सुप्रिया अनुते,जोशना बाईंग आशा कदम साक्षी कदम सुनिता कोळेकर उषा मत्रे शारदा मोडक आदीं पदाधिकारी,सदस्य आणि सभासद, हितचिंतक उपस्थित होते. या सर्वांनी आप-आपली जबाबदारी उत्तमरित्या बजावली.

या सोहळ्याला प्रमुख उपस्थिती मंडळाचे आधारस्तंभ धनाजी जाधव,मोरेश्वर विद्यालय संस्थापक - पंढरीनाथ पाटील, ॲड. वैभव पाटील,आशिष दळवी - ( ट्रेन मॅनेजर चर्चगेट ) यांची लाभली.सेक्रेटरी- श्री शिवजयंती उत्सव मंडळ आणि आषाढी एकादशी उत्सव मंडळ,तसेच सर्व सभासद आणि महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.सर्वांनी एकत्र येऊन हा भक्तिमय सोहळा अत्यंत शिस्तबद्ध आणि प्रेमाने पार पाडला.खरंतर ही दिंडी नव्हे तर भक्तीचा महापूर होता अशी प्रचिती आली.

## सौ.पवित्रा प्रज्ञेश कोरे यांची BMC निरीक्षक पदावर नेमणूक गौरव सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**- किशोर रमाकांत गुडेकर,**
**मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**







मुंबई – तेजल मनोहर पाटील (मा. पवित्रा प्रज्ञेश कोरे) यांनी MPSC परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण करत मुंबई महानगरपालिकेच्या (BMC) निरीक्षक या प्रतिष्ठित आणि जबाबदारीच्या पदावर नियुक्ती मिळवली आहे. MPSC मध्ये मिळालेली पदसंख्या लक्षात घेता, BMC मधील हे वरिष्ठ पद स्वीकारण्याचा त्यांनी योग्य निर्णय घेतला. त्यांच्या या यशामुळे समाजातील विविध क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या यशस्वी वाटचालीचा सन्मान म्हणून सोसायटी च्या वतीने तेजल पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात डॉली मकवाना, सौ. मोना राऊत, सौ. रागिणी दळवी, सौ. स्वाती गुडेकर, सौ. निलम खोत, सौ. अमृता वाघमारे, विकास दळवी, विवेक केळकर, दिनेश त्रिभुवन आदी मान्यवर उपस्थित होते.

मंदिर समितीचे अध्यक्ष श्री. महेंद्र केळकर आणि सचिव विवेक दळवी यांची उपस्थिती होती. यावेळी तेजल पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, "समाजाच्या हितासाठी आणि प्रामाणिक सेवेसाठी मी कटिबद्ध आहे. ही जबाबदारी माझ्यासाठी सेवा करण्याची एक संधी आहे."

विशेष म्हणजे, या सोहळ्यात मनसे रेल्वे कामगार सेना मुंबई विभागाचे सचिव श्री. निलेश दुर्वास खोत यांनी त्यांचा विशेष सत्कार करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## संत श्री गजानन महाराज मंदिरात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

**दैनिक युवक आभार प्रतिनिधी :-**
**योगेश पालोदकर**
**सिल्लोड**

:- तालुक्यातील पालोद येथील संत श्री गजानन महाराज मंदिरात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शेकडो श्री भक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला. गुरुपौर्णिमेनिमित्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन दिवसभरात करण्यात आले होते. सकाळी ६ वाजता संत श्री गजानन महाराज यांच्या मूर्तीचा अभिषेक करून विधिवत पूजन करण्यात आले. यानंतर ६.३० वाजता आरती करण्यात आली. दुपारी २ वाजता श्रींची आरती करून नैवेद्य दाखवण्यात आला. यानंतर सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

संत गजानन महाराज मंदिरात भाविकांनी सकाळपासूनच गर्दी केली होती." जय गजानन","गण गण गणात बोते" च्या गजरात संपूर्ण मंदिर परिसर दुमदुमला होता.

गुरुपौर्णिमेनिमित्त तालुक्यासह पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी यावेळी दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी बुलढाणा अर्बनचे शाखा संचालक ललित फेरवानी, व्यापारी हरीश खंडेलवाल, मोना नेटव्हिजनचे प्रदीप ढाकरे, विभागीय व्यवस्थापक संजय दळवी, शाखा व्यवस्थापक गजानन झाल्टे, अजय पाटील, डॉ. राहुल कुलकर्णी, डॉ. बीरेंद्र झलवार, कृष्णा पालोदकर, पंडित पालोदकर, अनिल पालोदकर, सुनिल लांडगे, डॉ.भोईटे,सांडू शेळके,गजानन पालोदकर, रामदास भवर , शंकर बांबर्डे, रामेश्वर सोनवणे,गणपत सोनवणे, भगवान पालोदकर, विठ्ठल पालोदकर, गंगाधर काटकर, दादाराव बदर,सागर पालोदकर, मुकेश पालोदकर, उमाकांत कुलकर्णी, रमेश सोन्ने, योगेश सोन्ने , सुनिल सोन्ने, नवनाथ वाघ, संजय पालोदकर, तुषार लांडगे, समाधान सोन्ने, अमोल पालोदकर, अनिल पालोदकर, अनिल सपकाळ, योगेश पालोदकर, सचिन पालोदकर,निखिल पालोदकर, कृष्णा हिवरे, सतीश सोनवणे आदींची उपस्थिती होती.



## डॉ.संतोष पाटील यांच्या पुढाकाराने देवगिरी महाविद्यालयात दुर्मिळ " फेटारा "वृक्षाचे रोपण..!

### पाळीव प्राण्यांना चावणाऱ्या घोणसच्या विषावर गुणकारी औषधोपयोगी वनस्पती

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड -** अनेकदा गाय, बैल, म्हैस ई. पाळीव प्राण्यांना घोणस हा अतीविषारी साप चावल्याने जीवावर बेतते. आज ही ग्रामीण भागात शेतकरी या जित्राबांना सर्प विषबाधा झाल्यास पारंपरिक,अनुभव व ज्ञानावर आधारित वनौषधीचा उपयोग करतात.घोणस सापास ग्रामीण बोली भाषेत "परड" म्हटले जाते.जनावरांना या प्रकारची विषबाधा झाल्यास शेतकरी सर्व प्रथम परडच्या मूळ्या म्हणजेच फेट रा वृक्ष मूळ दगडावर उगाळून या जनावरांना चमच्याने पाजतात. या मुळे जनावरे वाचल्याची अनेक उदाहरणे राज्यात आहेत. तालुक्यातील बहुली येथील परशुराम तुपे यांच्या बैलाला घोणस सर्प दंश झाला असता सिल्लोड येथील वृक्ष व वन्यजीव संवर्धक डॉ. संतोष पाटील, भाऊसाहेब निकोत व परशुराम तुपे यांनी डोंगरा लगत




माहिती असलेल्या झाडाची मूळ यासाठी वापरले. काही दिवसात बैल ठणठणीत बरा झाला. असे 3 पाळीव जनावरे वाचवण्यात पशु मालकांच्या सहमतीने व मदतीने या 7 वर्षात यश आले आहे. आदिवासी बांधवही पूर्वापार हाच उपाय प्राण्यांबाबत अवलंबतात. अजिंठा डोंगरालगत असलेल्या या झाडापासुन ही रोपं बनवून ती आज छत्रपती संभाजी नगर येथील वनस्पती उद्यानात" एक्स- सिटू" ( अधिवास बाह्य ), संवर्धन हेतू (कंझर्वेशन ) रोपण करण्यात आली आहेत.या वृक्षाचे अनेक औषधी उपयोग आहेत व उन्हाळ्यात उमलनारी ही फुलं मधमाशा व फुलपाखरे यांना उपयुक्त ठरतात.देवगिरी महाविद्यालयातील हर्बेरियम हे राज्यात उत्कृष्ट मानले जाते. याठिकाणी ही झाडे वनस्पती विभागाच्या देखरेखीखाली व्यवस्थित वाढवली जाऊन त्यावर प्राध्यापक व विद्यार्थी त्यावर संशोधन करतील. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक तेजणकर, वनस्पती शास्त्र विभागाचे उप प्राचार्य प्रा.डॉ.रवी पाटील,प्रा. डॉ.अपर्णा तावरे ,प्रा. डॉ.गणेश मोहिते,एन.एस.एसचे सह- समन्वयक डॉ.अनंत कांगरे, डॉ.संतोष पाटील, स्वयंसेवक विद्यार्थी ई.हस्ते ही रोप लावण्यात आली.

काय विशेष आहे या झाडात - "केरीस्कॉ इडस टर्गीडा" ( CERISCOIDES TURGIDA) असे शास्त्रीय नाव असलेल्या या वृक्षाचा मुख्य गुणधर्म शरीरा अंतर्गत रक्तस्त्राव थांबविणे हा आहे, सोबत "गार्डनीन" व इतर विषरोधक तत्व ही यात आहेत जे सायनरजिस्टिक- एकमेकांच्या हातात हात घालून शृंखला पद्धतीने कार्य करणारे घटक आहेत. त्यावर अधिक संशोधन देवगिरी महाविद्यालयाचे संशोधक व विद्यार्थी करतील हा विश्वास आहे
**.- डॉ. संतोष पाटील, अभिनव प्रतिष्ठान, सिल्लोड**

वनस्पती संशोधनाचा पथदर्शी उपक्रम - आपल्या महाविद्यालयाच्या "बोटॅनीकल गार्डन "मध्ये डॉ. पाटील हे अजून अनेक दुर्मिळ व उपयुक्त वृक्ष लवकरच लावणार आहेत.मराठवाड्यातील अभ्यासक, विद्यार्थी, संशोधक यांना अभ्यासाची चांगली संधी या निमित्ताने मिळाली आहे.
**- प्राचार्य डॉ. अशोक तेजणकर, देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर**

## शिळफाटा येथील दत्त मंदिरात गुरुपौर्णिमेचा सण मोठया उत्साहात साजरा.

**दैनिक युवक आधार,**
**कल्याण ग्रामिण प्रतिनिधी,**
**रमेश राऊत.**

दि.१२,शिळफाटा(डोंबिवली):पन्नास वर्षाची परंपरा असलेला शिळफाटा येथील दत्त मंदिरात आज भक्तमंडळी आणि महंत श्री. श्री.श्री.परमपूज्य स्वामी डी.के.दास महाराज यांच्या शिष्य मंडळांनी गुरुपौर्णिमेचा सण मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात पार पाडला शिळ फाटा येथे पन्नास ते साठ वर्ष जुनं सुंदर असं दत्त मंदिर येथे होते पण काही वर्ष्यापूर्वी रस्ता रुंदीकरण आणि बुलेट ट्रेन च्या कामामुळे हे मंदिर पाडण्यात आले आणि या ठिकाणी पुन्हा भव्य असे मंदिर उभारण्याचे काम सुरु करण्यात आले पण अजूनही त्या मंदिराचे काम अपूर्ण असल्यामुळे भक्त मंडळी आणि स्थानिकांमध्ये नाराजीचे वातावरण पाहावायस मिळत आहे



जरी येथे मंदिर नसले तरी दरवर्षी दत्त जयंती आणि गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने भावीक येऊन येथे महंत श्री. श्री. श्री. परम पूज्य स्वामी डी. के. दास महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेत असतात. येणाऱ्या प्रत्येक भक्ताला येथे महाप्रसादाचा लाभ ही घेता येतो,दत्त मंदिरातील भक्त मंडळी कडून येथे महाप्रसादाचे वाटप केले जाते.

# आरंभीच्या 'माणूसमाऱ्या' पुलाची समस्या 'जैसे थे'; उंची वाढविण्याची मागणी

दैनिक युवक आधार
दिग्रस तालुका प्रतिनिधी
उमेश साखरकर

तालुक्यातील लोकसंख्येने मोठे गाव असलेल्या आरंभी नजीकच्या चिरकुटा मार्गावरील नाल्याच्या पुलाची उंची अतिशय कमी असल्यामुळे पावसाळ्यात प्रवास करताना प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. अत्यल्प पाऊस पडला तरी लागलीच पुलावरून पाणी वाहायला सुरुवात होते. अनेक वर्षांपासून जीव धोक्यात घालून येथून प्रवास सुरू आहे. चार वर्षांपूर्वी जुलै महिन्यात आरंभी येथील मायलेकी या पुलावरून वाहून गेल्यामुळे त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. तरी देखील प्रशासनाचे डोळे उघडले नाहीत. गतवर्षी आरंभीचा एक तरुण याच पुलावरून प्रवास करताना पुरामधून थोडक्यात बचावला होता. त्यामुळे लवकरात लवकर सदर



नाल्यावरील पुलाची उंची वाढविण्याची मागणी ग्रामस्थ करीत आहेत. आरंभी– चिरकुटा मार्गावरील आरंभी नजीक असलेल्या पुलाची उंची कमी असल्यामुळे पावसाळ्यात लागलीच पुलावरून पाणी वाहायला सुरुवात होते. मुसळधार पावसात तर न बोलणेच खरे! त्याचा फटका स्थानिक नागरिक, शेतकरी, शेतमजूर, शालेय विद्यार्थी, गरोदर स्त्रिया, प्रवासी आणि नोकरदार वर्गाला बसतो. पुराचे पाणी ओसरेपर्यंत गावात येण्यासाठी शेतकऱ्यांना नाल्याच्या काठी भर पावसात थांबावे लागते. आरंभी गाव मोठे असल्याने येथे आठवडी बाजार, आरोग्य उपकेंद्र, शाळा, विद्यालय आणि अन्य सुविधा

**ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी**

आजी– माजी लोकप्रतिनिधी आरंभीला जाण्यासाठी याच मार्गाने प्रवास करतात. त्यांना ही समस्या दिसत नाही का? असा सवाल ग्रामस्थ करीत आहेत. आजवर गावातील पुढाऱ्यांनी मोठमोठी पदे भूषविली. मात्र ही समस्या सोडविण्यात ते सपशेल अपयशी ठरल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

**दाभा रस्त्यावरील पूल तयार**

आरंभी– दाभा रस्त्यावर, गावाला लागून असलेल्या नाल्यावर देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रथमच पूल बनून तयार झाला आहे. आधी बारमाही नाल्यातूनच प्रवास करावा लागे. आता मात्र रस्त्यावर पुलाची व्यवस्था झाल्याने ग्रामस्थ समाधान व्यक्त करत आहेत.

उपलब्ध असल्याने आजूबाजूच्या खेड्यातील लोकांची सतत ये- जा सुरू असते. शिवाय दिग्रस, आर्णी आणि दारव्हा या तीनही तालुक्यांतील नागरिकांना आरंभी गाव शॉर्टकट प्रवासासाठी सोयीचे ठरते.

संबंधित पुलाची उंची कमी तर आहेच. शिवाय पुलाची दुर्दशा देखील झाली आहे. पुलावर कोणत्याही प्रकारचे कठडे नाहीत. नाल्याचे खोलीकरण झालेले दिसत नाही. पूर येऊन गेल्यावर मोठ्या प्रमाणावर पुलावर काडी– कचऱ्याचा ढीग साचतो. त्यामुळे वाहन चालवणे कठीण होते. आजूबाजूच्या गावांशी संपर्क तुटतो. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी गांभीर्याने लक्ष देत नसल्याने ग्रामस्थांत संताप व्यक्त होत आहे. दरवर्षी संबंधित समस्येचे स्वरूप पाहता पुलाची उंची वाढविण्याच्या मागणीकडे जातीने लक्ष घालण्याची मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

## 15 जुलै रोजी ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे आरक्षण सोडत पद्धतीने करण्यासाठी 15 जुलै रोजी सकाळी 11 वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे सभा आयोजित करण्यात आली आहे.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागास प्रवर्ग तसेच महिला यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या सरपंच पदाचे आरक्षण सोडत पद्धतीने करण्यात येणार आहे. या सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन पनवेलचे तहसीलदार विजय पाटील यांनी केले आहे.

## रक्तदान शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

श्री प्रल्हादराय झुलेलाल ट्रस्ट, श्री पूज्य सिंधी पंचायत ट्रस्ट पनवेल, रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाउन, विद्यार्थी वाहक संस्था पनवेल, पनवेल– नवी मुंबई प्रिंट आणि डिजिटल पत्रकार संघटना, आम्ही रक्तदाते पनवेलचे, पनवेल तालुका पत्रकार विकास मंच आणि टाटा मेमोरियल सेंटर खारघर यांच्या सहकार्याने 13 जुलै रोजी सकाळी नऊ ते तीन वाजेपर्यंत रक्तदान शिबिर आणि मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. श्री पूज्य सिंधी पंचायत झुलेलाल मंदिर, विश्राली नाका पनवेल येथे हे शिबिर होणार आहे. या ठिकाणी सेल्फी पॉईंट उभारण्यात आले असून यावेळी ईसीजी आणि रक्त शर्करा तपासणी करण्यात येईल. या रक्तदान शिबिरात अवयव दान या विषयावर मार्गदर्शन केले जाईल

## गुरू म्हणजे ज्ञानाचा उगम अखंड वाहणारा एक झरा

**दैनिक युवक आधार**
**उल्हासनगर/रशीद शेख**

गुरू म्हणजे निष्ठा आणि कर्तव्य गुरु म्हणजे निस्सीम श्रद्धा आणि भक्ती गुरू म्हणजे विश्वास आणि वात्सल्य गुरू म्हणजे आदर्श आणि प्रतीक आजपर्यंत कळतं न कळतपणे मला ज्ञान दे ना रे या महानायक माझे गुरु धर्मा वसतात त्यांनी मला रोजी रोटीला लावले आणि माणूस म्हणून मला घडवले माणसा सारखे बोलायला लावले आणि वागायला लावले आज गुरुपौर्णिमेनिमित्त आज त्यांच्या निवासस्थानी जाऊन शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे आशीर्वाद घेतले आणि त्यांनी हि मला पुढच्या वाटचालीसाठी लाख लाख शुभेच्छा दिल्या की आज तु महारष्ट्र चा लाडका गायक आहेस लक्षीमण माळी तु आसाच गात राव्हे हिचं मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो हेच तुला माझा पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा



## न्यू ईरा इंटरनॅशनल स्कुल, सिल्लोड येथे गुरुपौर्णिमा साजरी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :** – न्यू इंटरनॅशनल स्कुल, सिल्लोड येथे गुरुपौर्णिमा हा पवित्र दिवस अत्यंत उत्साहात व भक्तिभावाने साजरा करण्यात आला. या दिवशी विद्यार्थ्यांनी आपले शिक्षक म्हणजेच गुरूजन यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करत त्यांना ग्रीटिंग कार्ड्स व फुलांची भेट दिली.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या प्रार्थनेने व गुरु वंदनेन झाली. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी तयार केलेल्या आकर्षक ग्रीटिंग कार्ड्स व फुलांद्वारे शिक्षकांना "HAPPY GURU PURNIMA" तसेच “THANK YOU TEACHER” च्या शुभेच्छा दिल्या. काही विद्यार्थ्यांनी सुंदर कविता, चारोळ्या, व आभार प्रदर्शनाचे शब्द सादर करून वातावरण भावविभोर केले.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या या अनोख्या उपक्रमाचे कौतुक करत त्यांच्यावर आशीर्वादाचा वर्षाव केला. ईरा ग्रुप ऑफ स्कुल चे अध्यक्ष श्री. गजानन गव्हाणे सर यांनी आपल्या भाषणात सांगितले, "गुरु हा विद्यार्थ्याच्या जीवनाचा आधारस्तंभ असतो. गुरूंच्या मार्गदर्शनामुळेच यशाचे शिखर गाठता येते.







कार्यक्रमात पारंपरिक उत्सवाचा बाज होता, मात्र त्यासोबतच विद्यार्थ्यांच्या भावनिक सहभागामुळे संपूर्ण वातावरण आनंददायी व स्नेहपूर्ण झाले. शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांनी या कार्यक्रमाचा मनःपूर्वक आनंद घेतला.

हा दिवस शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या नात्याला अधिक घट्ट करणारा ठरला आणि सर्वांच्या मनात एक अमिट आठवण निर्माण करून गेला.

## ॲड. योगिता सावंत यांचे कोकणातील प्रवाशांचा मुद्दा – अमित ठाकरे यांच्याकडे निवेदन सादर

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर,**
**मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

मुंबई : कोकण रेल्वे प्रवासी संघटना, सावंतवाडी यांच्या वतीने कोकणातील प्रवाशांच्या विविध समस्या व मागण्यांबाबत मनसे नेते अमित ठाकरे यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट न होऊ शकल्याने, हे निवेदन अमित ठाकरे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. या निवेदनात कोकणात दिवसेंदिवस वाढणाऱ्या प्रवाशांच्या संख्येनुसार स्वतंत्र व पूर्ण वेळेच्या रेल्वे टर्मिनसची आवश्यकता आहे, असा ठळक मुद्दा मांडण्यात आला. सध्या कोकण रेल्वेच्या प्रवाशांना मुंबई व उपनगरांतील स्टेशनांवर अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने, स्वयंपूर्ण सुविधा असलेले टर्मिनस निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्याचप्रमाणे, कोकण मार्गावरील रेल्वे तिकीट व आरक्षण कोटा वाढवणे,

स्थानिक युवक-युवतींना रेल्वेमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे,

सणासुदीच्या काळात विशेष गाड्या चालवणे, तसेच प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही व पोलिस बंदोबस्त वाढवणे यासारख्या अनेक मागण्या या निवेदनात नमूद करण्यात आल्या. ॲड. योगिता सावंत यांनी प्रवाशांच्या वतीने बोलताना सांगितले की, “कोकण हा जिव्हाळ्याचा भाग असून, येथे कामानिमित्त, शिक्षणासाठी





किंवा कौटुंबिक कारणांनी प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांची दररोज हालअपेष्टा होतात. या मागण्या केवळ सुविधांसाठी नसून, त्या प्रवाशांच्या हक्कासाठी आहेत.” संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, हे निवेदन केंद्र सरकारच्या रेल्वे मंत्रालयापर्यंत पोहोचवले जाईल आणि प्रवाशांच्या अडचणी सोडवण्यासाठी मनसे तर्फे पाठपुरावा केला जाईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी संघटनेचे अनेक पदाधिकारी व कोकणातील विविध भागांतील प्रतिनिधी उपस्थित होते.

# बुलंद आवाजाचा बादशाह अनंतात विलीन

## कलावंत महेशकुमार मयेकर यांचं दुःखद निधन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

जगात जन्माला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या अंगी नानारूपी कला अवगत असतात. कलाविश्वात अशी असंख्य उदाहरणे आहेत,असे अनेक कलावंत ह्या कलेवर आपल्या पोटाची खळगी,कुटुंबाचं उदरनिर्वाह करत जीवन जगत असतात.असा एक संयमी,नम्र,सरळ,साधं,नीरज कलावंत महेश मयेकर यांचं आज शुक्रवार ( दि.११ जुलै २०२५ ) रोजी रत्नागिरी येथे



निधन झाले.

महेश मयेकर म्हणजे अनेकांना कल्पित असणारे व्यक्तिमत्व होते.मराठी,हिंदी व दक्षिणात्या चित्रपट मधून हुबेहूब आवाज काढण्याची एक अद्‌भुत कला ह्या कलावंताच्या अंगी होती.एकपात्री अभिनय करण्यात एक सर्वोत्कृष्ट कलाकार म्हणून आपल्या आयुष्यात त्यांनी महाराष्ट्रभर अनेक कार्यक्रम केले. सिनेस्टार चंदू मयेकर प्रस्तुत "धम्माल माझ्या आवाजांची" ह्या कार्यक्रमातून सादरकरता म्हणून महेशकुमार मयेकर प्रमुख भूमिकेत असत. वाढदिवस,स्वागत समारंभ अशा सोहळ्याप्रसंगी महेशकुमार यांच्या कार्यक्रमाला प्रचंड मागणी असे.एक – दोन वर्षेपूर्वी महेशकुमार यांनी नमन लोककला संस्थेचे अध्यक्ष रविंद्रजी मटकर यांच्या ५० व्या जन्मदिनाच्या निमित्ताने आपली कला सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली होती.

कलावंत महेशकुमार यांचे चिपळूणचे निवेदक/ शाहीर शाहिद खेरटकर यांच्याशी फार जिव्हाळ्याचे संबंध होते.महेश कुमारच्या आकस्मिक निधनाचे बातमीने माझं कुटुंबचं सुन्न झाले.महेश सोबतच्या अनेक आठवणी स्मरणीय राहतील महेशकुमार यांची लहानपणीचं आई निधन पावली मागोमाग बाबांचे देखील निधन अशा अनेक संकटांचा सामना करत जगणारा हा कलावंत कायमच मनात राहील असे शाहीर शाहिदभाई खेरटकर यांनी मत व्यक्त केले.महेशकुमार यांच्या निधनाने कलाविश्वात मोठी दुःखद पोकळी निर्माण झाली आहे.महेशकुमार अंतिम यात्रेला रत्नागिरीतील अनेक कलावंत उपस्थित होते.त्यांनी महेश मयेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## 'युवा उद्योजक सतीश शेळके यांचा 'स्वप्न कथा फोटो & फिल्म्स' स्टुडिओ जयश्रीताई शेळके यांच्या हस्ते शुभारंभ"

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर,**
**मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

**शिरपूर** - येथील युवा उद्योजक सतीश शेळके यांचा "स्वप्न कथा फोटो & फिल्म्स "चा जयश्रीताई सुनील शेळके शिवसेना प्रवक्ता (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) यांच्या हस्ते शुभारंभ दिवसेंदिवस नवतरुण नोकरी च्या मागे न पळता उद्योगास प्राधान्य देऊन भविष्यात यशस्वी वाटचाल करीत आहे. ही खूप अभिमानाची गोष्ट आहे. असे धाडस शिरपूर येथील सतीश शेळके करीत आहे. उद्योगांमध्ये तो यशस्वी होत आहे. सतीश गजानन शेळके यांच्या फोटोग्राफीचा शुभारंभ सोहळा आज चिखली येथे जयश्रीताई शेळके यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. बुलढाणा जिल्हा कॉंग्रेस कमिटी मा. आ. राहुल भाऊ बोंद्रे ,युवा सेना नंदूभाऊ कऱ्हाडे, चिखली तालुका महिला आघाडी संघटिका अड. रूपालीताई चौधरी, शिवसेना उपशहर प्रमुख रविभाऊ पेटकर, युवा सेना उपशहरप्रमुख शंभूभाऊ गाडेकर, युवा सेना समन्वय अनिलभाऊ जावरे, साजिद भाई, नारायणभाऊ वाणी व इतरमंडळी उपस्थित होती . सतीशने वयाच्या 18 व्या वर्षी एका सेकंड हॅड कॅमेऱ्यापासून फोटोग्राफीची सुरुवात केली होती आज त्याने त्याच्या मेहनतीच्या जोरावर






चिखलीमध्ये एक सर्वात लहान वयाचा यशस्वी फोटोग्राफर म्हणून नावलौकिक केलं आहे सोबतच एम एस सी मायक्रोबायोलॉजी देखील करत आहे. उच्च शिक्षण घेत असताना आपली आवड जोपासत त्या आवडीचे रूपांतर चांगल्या व्यवसायात सतीश ने केले आहे. सतीश ला व्यावसायिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा

## आम्ही कोकणकर पुरस्कृत "कोकण सन्मान" सोहळ्याचे बहारदार आयोजन

### कोकणातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या तरुण व्यक्तींना "कोकण युवा सन्मान पुरस्कार - २०२५" पुरस्काराने होणार गौरव

**दैनिक युवक आधार**
**मुंबई - ( केतन भोज)**

कोकणच्या मातीतील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्तुत्वान व्यक्तींना एकत्र आणत आणि त्यांच्या कार्याचा गौरव करत , आम्ही कोकणकर संघटनेच्या वतीने कोकण सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा रविवार दि.१३ जुलै २०२५ रोजी संध्याकाळी ७.३० वाजता श्री शिवाजी नाट्यमंदिर,दादर (मुंबई) येथे संपन्न होणार आहे. आम्ही कोकणकर ही संघटना गेली दहा वर्षे कोकणातील तरुण पिढीला एकत्र आणत,कोकणच्या सांस्कृतिक , सामाजिक आणि कलात्मक क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत आहे. विशेषतः कोकणातील कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणे, त्यांना योग्य संधी मिळून देण्यासाठी ही संघटना सातत्याने कार्यरत आहे. "कोकण सन्मान सोहळा" या कार्यक्रमाद्वारे कोकणातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या तरुण व्यक्तींना "कोकण युवा सन्मान पुरस्कार २०२५" हा पुरस्कार देऊन त्यांना गौरवण्यात येणार आहे. कार्यक्रमात धमाल,मस्ती,कॉमेडी, प्रबोधनपर,मनोरंजन आणि कोकणवासीयांसाठी खास सांस्कृतिक सादरीकरण पाहायला मिळणार आहे.या सोहळ्यात मनोरंजन म्हणून गर्जना– कहाणी हिंदुत्वाची ही नाट्यकला कृती दाखवण्यात येणार आहे. कोकण सन्मान सोहळा रसिक प्रेक्षकांसाठी मोफत असून कोकणवासीयांनी आपल्या परिवारासह मोठ्या संख्येने उपस्थित राहावेअसे आव्हान संघटनेचे संस्थापक /लेखक /दिग्दर्शक कृष्णा नंदा शांताराम येद्रे यांनी केले आहे.चला एकत्र येऊन साजरा करूया उत्सव कोकण संस्कृतीचा! सदर कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असून प्रवेशिका व अधिक माहितीसाठी ९७७३१४२८१९ /८६५२१४१५६१ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आव्हान करण्यात आले आहे.




**सिद्धी प्रिंटर्स**

दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.

वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये डीटीपी करून मिळेल

Call 9028240020 ,9220403509

# नागपूर प्रमाणेच जळगाव, बीडमध्ये बोगस भरती!

## उच्चस्तरीय चौकशी सुरु!

**बीड आष्टी प्रतिनिधी :-**
**मारुती सत्रे**

नागपूर बोगस शालार्थ आयडी घोटाळा उघडकीस आल्यानंतर राज्यभरात एकच खळबळ उडाली दरम्यान या प्रकरणांमध्ये वीस पेक्षा अधिक अधिकारी आणि दोन ते तीन संस्थाचालक यांना अटक झाल्यानंतर असे प्रकार राज्यभर झाल्याचे समोर आले आहे नागपूर अमरावतीनंतर जळगाव जिल्ह्यात देखील शेकडो बोगस शिक्षकांची नियुक्ती झाल्याची बाब उघडकीस आली आहे असाच काहीसा प्रकार मराठवाड्यात विशेषतः बीड जिल्ह्यात झाल्याचे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आल्यानंतर उच्चस्तरीय चौकशी सुरू झाली आहे त्यामुळे लाखो रुपये मोजून शिक्षक आणि कर्मचारी म्हणून नोकरीला लागलेल्या लोकांचे आणि संस्थाचालकांचे धाबे दणाणले आहेत. अधिकारी व संस्थाचालकांच्या हातमिळवणीतून पावणेसातशेहून अधिक नियमबाह्य शालार्थ आयडी जारी करण्यात आले. ज्यांना शिकवतादेखील येत नाही, अशा शिक्षकांची संस्थाचालकांनी शाळांमध्ये नियुक्ती करवून शासनाचे वेतन चालू करवून घेतले. अशा पद्धतीचे ३६ शिक्षण संस्थाचालक आता पोलिसांच्या रडारवर असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे खळबळ उडाली आहे. याप्रकरणी दोन अधिकाऱ्यांना निलंबित केले असून संबंधित शिक्षक व कर्मचारी, शाळा पदाधिकारी यांच्यावर फौजदारी कारवाईचे आदेश शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने मंगळवारी दिले. नाशिकचे विभागीय शिक्षण उपसंचालक, लेखाधिकारी उदय पंचभाई आणि तत्कालीन वेतन अधिक्षक राजमोहन शर्मा यांनी शिक्षण उपसंचालकांकडून 'शालार्थ'चे आदेश मंजूर करून न घेता स्वत:च्या स्तरावर ४९ शिक्षक व कर्मचाऱ्यांची भरती केली. गेली पाच वर्षे या बोगस ४९ कर्मचाऱ्यांनी पूर्ण पगार घेतला आहे. यामध्ये निधीचा अपहार झाला असून याप्रकरणाची सहसंचालक दर्जाच्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून अहवाल सादर करण्याचे आदेश प्रधान सचिव रणजितसिंह देओल यांनी दिले आहेत. जळगाव जिल्ह्यातील समोर आलेले शालार्थ घोटाळा प्रकरणी २५ कोटींच्या निधीचा अपहार झाल्याचा अंदाज आहे. बीड जिल्ह्यातील काही संस्था चालकांनी प्राथमिक आणि माध्यमिक विभागात जी बोगस भरती केली त्या शिक्षकांचे मागील फरकाची बिले ज्या ज्या बँकांमधून काढण्यात आली त्या त्या बँकांच्या नावासहित शाळांची नावे देखील लवकरच न्यूज च्या माध्यमातून जनतेसमोर मांडली जाणार आहेत ज्या शिक्षकांनी थकबाकीची रक्कम एक रकमे संस्था चालकांच्या हातात उचलून दिली त्यांना आरबीआय कडून नोटीसा प्राप्त झाल्या असल्याचे देखील पुरावे हाती लागले असून ते देखील उघड केले जाणार आहेत.

**पाळेमुळे किती खोल?**

जळगावमधील घोटाळ्याची व्याप्ती आणखी मोठी असण्याचा विभागाला संशय आहे. शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी याप्रकरणी कठोर भूमिका घेतली आहे. अनियमिततेबाबत विभागातील अधिकाऱ्यांची पूर्वी खातेनिहाय चौकशी होत असे. सदर चौकशी संबंधित कर्मचारी निवृत्ती होईपर्यंत पूर्ण होत नसे. 'शालार्थ' घोटाळा प्रकरणी मात्र फौजदारी गुन्हे नोंदवण्यात येत असून 'एसआयटी' नेमण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

जळगाव 'शालार्थ' घोटाळा प्रकरणी संबंधित अधिकारी, कर्मचारी तसेच खासगी अनुदानित शाळांमधील जबाबदार कर्मचारी व पदाधिकारी यांच्या विरोधात फौजदारी गुन्हे दाखल केले जात आहोत. सदर गुन्ह्याचा तपास 'विशेष चौकशी पथका'मार्फत (एसआयटी) करण्याबाबत पोलीस विभागास विनंती करण्यात आली आहे

# शिष्यवृत्ती परीक्षेत वैनतेय विद्यालयाचा अर्णव कडलग निफाड तालुक्यात प्रथम

## पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ५ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

निफाड येथील वैनतेय विदयालय येथील इयत्ता 5 वी साठी असलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत अर्णव नितीन कडलग हा विद्यार्थी 298 पैकी 242 गुण मिळवून निफाड तालुक्यात प्रथम तर जिल्ह्यात 32वा आला आहे. वैनतेय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश मिळवले असून,पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता पाचवीचा विद्यार्थी अर्णव नितीन कडलग या विद्यार्थ्यांचा तालुक्यात प्रथम क्रमांक आला तर इयत्ता 8 वी साठी असणाऱ्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत (जिल्हास्तर शहरी विभागात )पाच विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक ठरले आहे.

या यशस्वी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती विभाग प्रमुख वैभव कर्डीले,श्रीमती एम. डी.वाघ, श्रीमती पी. ए.कराड,श्रीमती आर. एस. गायकवाड, ए. एम भामरे यांनी मार्गदर्शन केले.



शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांसमवेत खासदार भास्कर भगरे ,पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी श्रीमती नम्रता जगताप, संस्थेचे कार्यकारी विश्वस्त वि.दा. व्यवहारे ,संस्थेचे विश्वस्त रतन पाटील वडघुले, मधुकर राऊत, विश्वास कराड , वैनतेय विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती मनीषा गुजराथी, माजी प्राचार्य एम एस माळी, सोबत मार्गदर्शक शिक्षक

पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती इयत्ता 8 वी साठी असणाऱ्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी याविद्यालयाचे(जिल्हास्तर शहरी) विभागात 44 विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी 12 विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून 5 विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र (धारक) ठरले आहे शिष्यवृत्ती पात्र ठरलेले 5 विद्यार्थी पुढील प्रमाणे – श्रेया आव्हाड , संस्कार सांगळे, आराध्या शिंदे, ऋषिकेश वाळुंज , अनुष्का घुमरे या यशस्वी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती विभाग प्रमुख श्रीमती एस. एन .पटेल, तसेच शिक्षक श्रीमती एस. एस कापसे, श्रीमती के. डी. सानप, श्रीमती टी. के.राखुंडे, श्रीमती आर डी. पवार, श्रीमती पी. व्ही.भोज यांनी मार्गदर्शन केले.

यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचा खासदार भास्कर भगरे ,पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी श्रीमती नम्रता जगताप, न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि.दा. व्यवहारे ,संस्थेचे विश्वस्त रतन पाटील वडघुले, मधुकर राऊत, विश्वास कराड ,वैनतेय विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती मनीषा गुजराथी, पर्यवेक्षक गुलाब टकले , पर्यवेक्षक बी. बी .गुंजाळ ,माजी प्राचार्य एम एस माळी यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला

यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे
न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि.दा.व्यवहारे संस्थेचे विश्वस्त अँड आप्पासाहेब उगांवकर , रतन पाटील वडघुले,किरण कापसे ,राजेंद्र राठी, अँड दिलीप वाघवकर, राजेश सोनी, प्रभाकर कुयटे, मधुकर राऊत विश्वास कराड ,नरेंद्र नांदे ,वैनतेय विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती मनीषा गुजराथी, पर्यवेक्षक गुलाब टकले , पर्यवेक्षक बी. बी .गुंजाळ आदींनी कौतुक केले

# गेल इंडिया लि., उसर अलिबाग : बेमुदत संपावर तोडगा, प्रकल्पग्रस्तांच्या संघर्षाला मोठे यश!

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

गेल इंडिया लिमिटेड उसर अलिबाग प्रकल्पात सुरू असलेल्या बेमुदत काम बंद आंदोलनावर अखेर तोडगा निघाला आहे. संयुक्त प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समितीच्या नेतृत्वाखाली गेल्या अनेक दिवसांपासून सुरु असलेल्या आंदोलनाने व्यवस्थापन आणि प्रशासनाला झुकवले, आणि प्रकल्पग्रस्तांच्या मुख्य मागण्या मान्य करण्यात आल्या.

**"संघर्षातून मिळालेले ठळक यश:**

1. 260 स्थानिक युवकांना केवळ 10 दिवसांत कामावर घेण्याचे लेखी आश्वासन. 2. पूर्वी गेटपास रद्द करण्यात आलेल्या मजुरांना



पुन्हा कामावर घेण्याचा निर्णय. 3. बाहेरून आणलेल्या इलेक्ट्रिशियनच्या फेरतपासणीनंतर त्यांच्या जागी स्थानिक प्रकल्पग्रस्तांना कामावर घेण्याचे ठरले. 4. स्थायीक भरतीसंदर्भात प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवण्याचे प्रशासनाचे स्पष्ट आश्वासन. 5. CSR निधीच्या वापरावरून प्रकल्पग्रस्त व प्रशासन यांच्यात बैठक घेऊन योग्य तो निर्णय होईल, असे जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले.

या यशस्वी वाटाघाटी दरम्यान संघर्ष समितीचे अध्यक्ष श्री. निलेश गायकर यांनी उद्यापासून बेमुदत संप मागे घेत असल्याची अधिकृत घोषणा केली. या महत्त्वपूर्ण बैठकीला डिप्टी कलेक्टर वाघमारे, खासदार धैर्यशील माने पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, गेल कंपनीचे वरिष्ठ अधिकारी, तसेच नेते निलेश गायकर, आनंद शिंदे, सुरेश धसाडे आणि सर्व प्रकल्पग्रस्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संघर्ष केल्याशिवाय हक्क मिळत नाही !स्थानिकांना रोजगारात डावलल्यामुळे गेल कंपनीविरोधात प्रकल्पग्रस्तांत प्रचंड असंतोष होता. मात्र चिकाटीने चालवलेल्या या संघर्षामुळे अखेर प्रशासनाला झुकावे लागले आणि प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या मान्य झाल्या. हा केवळ रोजगाराचा नव्हता, तर स्थानिकांचा स्वाभिमान आणि हक्काचा लढा होता.संघर्षाला यश मिळाले असून, आता लवकरच प्रत्यक्ष अंमलबजावणी पाहायला मिळेल, असा विश्वास प्रकल्पग्रस्तांमध्ये व्यक्त होत आहे.

# महात्मा गांधी विद्यालयाचे शिक्षक रफिक पठाण सेवानिवृत्त

## मान्यवरांच्या उपस्थितीत सेवागौरव सोहळा उत्साहात संपन्न.

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** पाटोदा तालुक्यातील नायगाव मयुर येथील महात्मा गांधी विद्यालयातील शिक्षक रफिक पठाण वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्ती निमित्त त्यांचा शाळेच्या वतीने मान्यवरांच्या उपस्थितीत सेवापुर्ती कार्यगौरव करण्यात आला. या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रगती शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक मा.रामकृष्ण बांगर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रकाश कवठेकर यांची उपस्थिती होती. या प्रसंगी झालेल्या मनोगत व्यक्त करताना रफिक पठाण यांच्या सेवाकाळातील जुन्या आठवणींना शिक्षकांनी उजाळा दिला. तर रफीक पठाण हे विद्यार्थी प्रिय शिक्षक असल्याचे गौरवोद्गार काढले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले प्रकाश कवठेकर यांनी महात्मा गांधी विद्यालयातील शिक्षक रफिक पठाण यांचा सत्कार केला. या वेळी सरपंच मंजुषा कवठेकर, ह.भ.प.शिवाजी महाराज येवले,




शिक्षक संघटनेचे डि.जी.तादळे सर, माजी सरपंच अशोक सुपेकर, तुकाराम मोहोळकर, माजी सरपंच सय्यद शाहिद, छाया शिंदे, येवले, सानप, तुपे, सांगळे, दिलीप कंठाळे, वारभवन सर, डोईफोडे सर, पठाण सर, चोले सर यांच्या सह विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पूरग्रस्तांना, नुकसानग्रस्त कुटुंबांना तातडीची मदत आणि पंचनामे त्वरित पूर्ण करा

## खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांचे जिल्हा प्रशासनाला निर्देश

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा:-** भंडारा जिल्ह्यात ९ जुलै पर्यंत झालेल्या अतिवृष्टीमुळे भीषण पूरस्थिती निर्माण झाली होती. यामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेण्याचे निर्देश भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. प्रशांत यादवराव पडोळे यांनी जिल्हा प्रशासनास दिले आहे. या पूर परिस्थितीमुळे ज्यांना नुकसान सोसावे लागले, त्या नुकसानग्रस्तांच्या तक्रारी समजून घेण्याचे व त्वरित पंचनामे करण्याचे निर्देश खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांनी दिले आहेत. खासदार



डॉ.प्रशांत पडोळे यांनी सांगितले की पूरस्थितीमुळे अनेक गावांतील रस्ते पाण्याखाली गेले होते, शेतीचे प्रचंड नुकसान झाले, घरे पडली व गुरे वाहून गेल्याच्या तक्रारी आहेत. यामुळे ग्रामीण भागाला मोठा फटका बसला आहे, पंचनामा करताना प्रशासन संवेदनशीलता आणि तत्परता दाखवेल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

ते पुढे म्हणाले की मदतीच्या बाबतीत कोणीही उपेक्षित राहू नये. प्रशासनाने गावोगाव जाऊन लोकांच्या गरजा समजून घ्याव्यात. ज्या नागरिकांना शेतीचे नुकसान, घरांचे नुकसान, गुरे वाहून जाण्याचे संकट आले आहे त्यांचे पंचनामे तात्काळ पूर्ण करावेत आणि शासनस्तरावरून मदत मिळवण्यासाठी त्वरित प्रस्ताव पाठवावेत,असे खासदार पडोळे यांनी सांगितले. त्याचबरोबर, प्रशासनाने आतापर्यंत काय पावले उचलली आहेत याचा सविस्तर अहवाल तातडीने खासदार कार्यालयास सादर करावा, असे निर्देशही त्यांनी दिले आहेत.धोका अजून टळलेला नाही – खासदार डॉ. प्रशांत पडोळेखासदार पडोळे यांनी इशारा दिला की, पाऊस थांबला असला तरी धोका टळलेला नाही. अतिवृष्टी पुन्हा होऊ शकते. त्यामुळे प्रशासनाने सतर्क राहावे. अतिवृष्टीमुळे संकट पुन्हा येऊ शकते. त्या करीता आपण सर्वांनी एकत्र येऊन संवेदनशील प्रशासन म्हणून काम करण्याची वेळ आहे. संकटग्रस्तांना असा कधीही अनुभव येऊ नये की शासन-प्रशासन त्यांच्यापासून दूर आहे. प्रत्येक कुटुंब, प्रत्येक नागरिकापर्यंत आधार पोहोचवणे ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे.पंचनाम्याच्या प्रक्रियेमध्ये कोणताही अन्याय झाल्यास, मदतीबाबत अडचणी असल्यास किंवा प्रशासनाकडून दुर्लक्ष झाल्यास त्या तक्रारी थेट खासदार कार्यालयास कळवाव्यात, असे आवाहन देखील भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. प्रशांत यादवरावजी पडोळे यांनी केले आहे.

# श्री स.स. बाळकृष्ण माऊली चरित्र ग्रंथाचा प्रकाशन सोहळा आणि गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात

## श्री तीर्थक्षेत्र नंदेश्वरसाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून २१ लाख रुपयांची तर जे. एम. म्हात्रे यांच्याकडून ०५ लाखाची देणगी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

श्री स.स. बाळकृष्ण माऊली चरित्र ग्रंथाचा प्रकाशन सोहळा आणि गुरुपौर्णिमा उत्सव गुरुवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत सोलापूर येथे श्री क्षेत्र नंदेश्वर येथे संपन्न झाला. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी श्री तीर्थ क्षेत्र नंदेश्वर साठी २१ लाख रुपयांची देणगी जाहीर केली. तसेच ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे यांनी ५ लाख रुपयांची देणगी जाहीर केली. या प्रसंगी श्री स.स. बाळकृष्ण माऊली यांच्या पादुका पूजन सोहळा देखील आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये हजारो भाविकांनी सहभाग घेत दर्शन घेतले. या कार्यक्रमात काकड आरती, श्री ची नित्य



पूजा, सुस्वर संगीत भजन, माऊलींच्या पादुकांचे पूजन, सांप्रदायिक भजन आणि आरती असे विविध धार्मिक कार्यक्रम झाले. हा सर्व सोहळा श्री स.स. बाळकृष्ण माऊली अध्यात्मज्ञान मंदिर, श्री क्षेत्र नंदेश्वर सोलापूर येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाला श्री क्षेत्र नंदेश्वरचे मठाधिपती बाळासाहेब महाराज, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, पनवेल पंचायत समितीच्या आजी सदस्या रत्नप्रभा घरत, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, सरपंच विजेंद्र पाटील, वीरेंद्र म्हात्रे, रमण ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, कल्पना ठाकूर, चंद्रभागा ठाकूर, राधाताई ठाकूर, अरुण घरत, जी. के. ठाकूर, श्रीधर ठाकूर, स्नेहलता ठाकूर, हिरालाल ठाकूर, नामदेव ठाकूर, आप्पा पांचाल, किसन मुकुल, अनिल कोळी, प्रशांत कोळी, शिवू महाराज, सागर ठाकूर, नारायण ठाकूर, ज्योती ठाकूर, मीनाक्षी पाटील, देव सागर साधक समाज, इंचगिरी संप्रदाय न्हावा, न्हावा खाडी, गव्हाण, कोपर, शिवाजी नगर, येथील भाविक उपस्थित होते. या कार्यक्रमात माउली नवनाथ म्हात्रे आणि दीपाली म्हात्रे यांनी २ लाख ५० हजार, वर्षाताई घोडके यांनी २ लाख, कैलासवासी लक्ष्मण ठाकूर आणि कैलासवासी महादेव ठाकूर यांच्या स्मरणार्थ राधाताई ठाकूर व अहिल्या ठाकूर यांच्याकडून १ लाख ११ हजार १११, यश मारिन सर्व्हिसेस यांच्याकडून १ लाख, ११ हजार १११, कैलासवासी लक्ष्मण जोमा नाखवा आणि कैलासवासी जिजाबाई नाखवा यांच्या स्मरणार्थ गव्हाण कोळी परिवार तर्फे ५१ हजार, कान्हाशेठ ठाकूर यांच्याकडून १ लाख, कैलासवासी हसुराम ठाकूर यांच्या समरणार्थ श्रीधर हसुराम ठाकूर यांच्याकडून ५१ हजार, कैलासवसी बाबू ठाकूर यांच्या स्मरणार्थ इंदिरा ठाकूर यांच्यावतीने ५१ हजार, कैलासवासी विनायक कोळी यांच्या स्मरणार्थ लीलाबाई कोळी यांनी ५५ हजार, चंद्रभागा घरत यांनी ५१ हजार, कैलासवासी देवकुबाई ठाकूर यांच्या स्मरणार्थ दशरथ ठाकूर यांच्या वतीने ५१ हजार, सखाराम कदम यांनी १ लाख, बंडोपंत डोंगरे यांनी १ लाख, नागजी लोखंडे यांनी १ लाख, नंदाताई डोंगरे यांनी १ लाख, कैलासवासी समीर म्हात्रे यांच्या स्मरणार्थ गुलाब म्हात्रे यांच्याकडून ५१ हजार, नानासाहेब फिरके यांच्या वतीने १ लाख रुपयांची रुपयांची देणगी देण्यात आली आहे.

# फरार डॉक्टरला अटक करा:_ महामाया महिला सामाजिक न्याय संघटनेचे मागनी

## पोलीस उपविभागीय अधिकारी यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा-** साकोली पोलीस ठाणे हद्दीतील एका श्याम हॉस्पिटलमध्ये एका 17 वर्षीय अल्पवयीन मुलीवर सोनोग्राफीच्या नावाखाली गैरवतन केले ते धक्कादायक घटना उघडकीस आली आहे याप्रकरणी पीडित मुलीच्या वडिलांनी साकोली पोलीस स्टेशन ठाण्यात तक्रार दाखल केली तक्रारीवरून पोलिसांनी डॉ देवेश अग्रवाल यांच्याविरुद्ध पोसको कायदासह सह यांच्या अनुसूचित जाती जनजाती कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे डॉक्टर फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले सविस्तर माहिती असे की पीडित मुलगी ही आपल्या आई सोबत उपचारासाठी श्याम हॉस्पिटल साकोली येथे गेली होती डॉ देवेश अग्रवाल यांनी सोनोग्राफी करावी लागेल असे सांगून आई व नर्सला बाहेर बसून मुली सोबत एकांचा तब्बल अर्धा तास गैरवर्तन केल्याचा आरोप आहे घरी परतल्यानंतर मुलीने वडिलांना सर्व प्रकार सांगितले त्या नंतर कुटुंबीयांनी साकोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली पोलिसांनी डॉ देवेश अग्रवाल यांच्याविरुद्ध पोस्को कायदा आणि भारतीय न्याय सुविधा 2023 अंतर्गत अनुसूचित जाती



अनुसूचित जमाती कलमाध्ये गुन्हा दाखल केला आहे डॉक्टर अद्याप करार आहे या घटनेमुळे साकोली शहरात संतापती लाट पसरली आहे डॉक्टर डॉक्टरला अटक करून कठोर कारवाई करण्याची महामाया महिला सामाजिक न्याय संघटना उपविभागीय पोलीस अधिकारी यांना निवेदन देऊन केली आहे

निवेदनावर महामाया सामाजिक महिला न्याय संघटनेचे संस्थापक डी जी रंगारी महामाया महिला सामाजिक न्याय संघटनेचे अध्यक्ष शितल नागदेवे, प्रतिमा राऊत, कल्पना सांगोळे, स्नेहा नागदेवे, आचल तागडे ,प्रतिमा राऊत ,भावेश कोठांगले ,इंद्रायणी कापगते , प्रमिला टेंभुरकर,कार्तिक मेश्राम सह्या आहेत.

# नफरवाडीच्या जिल्हा परिषद शाळेची मुंबईच्या पारिजात संस्थेकडून दखल

## संस्थेकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप...

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** पाटोदा तालुक्यातील नफरवाडी येथील आय.एस.ओ.मानांकित जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या कार्याची दखल घेत मुंबई येथील पारिजात संस्थेच्या वतीने गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री.उत्तरेश्वर औटे तर प्रमुख पाहुणे पाटोदा तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी श्री.धनंजय बोंदार्डे साहेब तसेच गावचे सरपंच बंडू सवासे, शिक्षणप्रेमी नागरिक सावंत सर, उपसरपंच केशव तांबे, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष अशोक वाघ, सदस्य बाळू ढोले, रविकांत वनवे, लहू दराडे, दगडू मंडलिक, अशोक मंडलिक, श्रीकांत बुधवंत, रविकांत पांडव, सुभाष सवासे हे होते. कार्यक्रमाचा प्रारंभ क्रांतीज्योती सावित्रीमाई यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आला. त्या नंतर बीटीएस आणि मंथन तसेच शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केलेल्या शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री अण्णासाहेब खंडागळे सर यांनी केले यामध्ये त्यांनी उपस्थितांना सांगितले की, पारिजात मुंबई संस्थेच्या माध्यमातून अनेक सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रम वर्षभर राबविले जातात. या मधील बॅक टू स्कूल हा महत्वाचा आणि यशस्वी उपक्रम आहे. बॅक टू स्कूल उपक्रमाच्या माध्यमातून आपल्या शाळेतील ११५ विद्यार्थ्यांना शालेय दप्तर SCHOOL BAG आणि शालेयउपयोगी शैक्षणिक साहित्याची किट दिल्याबद्दल शाळेच्या वतीने, ग्रामस्थांच्या वतीने पारिजात संस्था मुंबई यांचे आभार तसेच ऋण व्यक्त केले. पारिजात संस्थेचे इतर उपक्रम उदाहरणार्थ वृक्षारोपण, सामाजिक वनीकरण करण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने उपस्थितांना केले त्याचे वेळोवेळी अहवाल,फोटो पारिजात संस्थेला पाठवायचे आहेत अशी माहिती दिली. प्रास्ताविका नंतर सर्व मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारिजात मुंबई संस्थेच्या वतीने देण्यात आलेले साहित्य वाटप करण्यात आले. साहित्य वाटपानंतर विद्यार्थ्यांचा विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद खरोखरच पाहण्यासारखा होता. त्या नंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे गटशिक्षणाधिकारी श्री.धनंजय बोंदार्डे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले यामध्ये विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय परीक्षा याविषयी मार्गदर्शन केले त्याच बरोबर पालकांना शिक्षणाचे महत्व विशद करताना असे सांगितले की आपल्या पाल्यांचे चांगले शिक्षण आणि संस्कार हीच आजच्या काळाची खरी गरज आहे. त्या मुळे सर्व पालकांनी आपापल्या पाल्यांकडे अधिक लक्ष देण्याचे आवाहन केले. आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नफरवाडी शाळेतील शाळेची गुणवत्ता दिवसेंदिवस वाढत आहेत शाळा कल्पकतेतून, लोक सहभागातून, समाज सहभागातून वेगळी आणि यशस्वी वाटचाल करत आहे त्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक तसेच सर्व शिक्षक पालक यांचे अभिनंदन केले. त्याच बरोबर पारिजात संस्था मुंबई सुगंध जगण्यातला यांनी शाळेला केलेल्या मदतीबद्दल धन्यवाद व्यक्त केले. सदरील कार्यक्रमासाठी गावातील दत्तात्रय सवासे, संतोष वाघ, पांडुरंग तांबे, संभाजी चव्हाण, खंडू तळेकर, काशिनाथ सस्ते, काकासाहेब मंडलिक, लक्ष्मण कवडे, प्रदिप वाघ, कैलास तांबे, गणेश शिंदे, ज्ञानोबा तांबे , किशोर तळेकर, भागवत दराडे आदी पुरुष पालक तसेच महिला पालक,शिक्षणप्रेमी नागरिक, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मुरूमकर सर यांनी तर आभार प्रदर्शन श्री. राऊत सर यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील श्रीम. काकडे मॅडम, वावरे मॅडम, ट्रेनी शिक्षक सुशील ढेरे तसेच शाळेतील सर्व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.





"हजार हृदये गहिवरली तर, मन माझे गहिवरते, असे हजारो संगे आहे, जडलेले माझे नाते"
या काव्यपंक्ती वाचायला किती सुंदर वाटतात ना आणि याचा जीवनात अवलंब करणारी माणसे जगात आहेत याचा प्रत्यय आला आमच्या जि.प.प्रा.शा.नफरवाडी शाळेला आला तो पारिजात या संस्थेच्या मदतीतून...!!!
स्वतःसाठी लाखो रुपये खर्च करणारी माणसे जशी या जगात आहेत तसेच स्वतःच्या गरजा मर्यादित ठेवून, इतरांचे मदतीचे हात एकत्र करून गरजू विद्यार्थ्यांच्या जीवनात आनंद फुलवण्याचे काम पारिजात संस्था करते. पारिजातकाचे फुल जसं स्वतःच्या अल्पशा आयुष्याने सृष्टी सुगंधित करते तसेच काम ही संस्था करत आहे. हे मदतीचे हात अनेकांच्या गरजा पूर्ण करून त्यांचे जीवन तिमिरातून तेजाकडे नेण्याचे काम करत आहेत. पारिजात संस्थेने त्यांच्या सुगंध जगण्यातला या घोषवाक्यप्रमाणे आमच्या शाळेतील ११५ विद्यार्थ्यांच्या जीवनात खरोखरच सुगंध देण्याचे अमूल्य कार्य केले आहे.

## पीएलआय-वाहनअंतर्गत दाव्यांचे जलद वितरण करण्यास वचनबद्ध : कुमारस्वामी

**नवी दिल्ली :** वाहन उद्योगासाठी असलेल्या पीएलआय योजनेने मार्च २०२५ पर्यंत २९,५७६ कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित केली आहे आणि ४४,९८७ पेक्षा जास्त नोकऱ्या निर्माण केल्या आहेत. मंत्र्यांनी या योजनेंतर्गत पात्र वाहन कंपन्यांना प्रोत्साहन जलद वितरण करण्याचे आश्वासन देखील दिले.

केंद्रीय मंत्री एच. डी. कुमारस्वामी यांनी गुरुवारी सांगितले की, वाहन आणि वाहन कंपोनंट उद्योगासाठी उत्पादनाशी संबंधित प्रोत्साहन (पीएलआय) योजना (पीएलआय-ऑटो योजना) चा आर्थिक वर्ष २३ ते आर्थिक वर्ष २७ पर्यंत २५,९३८ कोटी रुपयांचा खर्च आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ दरम्यान, चार अर्जदारांनी प्रोत्साहन दावे सादर केले आणि त्यांना ३२२.०१ कोटी रुपये वाटप करण्यात आले.

या योजनेमुळे वाहन उद्योगाच्या मूल्य साखळीत ४४,९८७ पेक्षा जास्त नोकऱ्या निर्माण झाल्या आहेत, असे 'एक्स'वरील एका पोस्टमध्ये, अवजड उद्योग मंत्री म्हणाले.

## एप्रिल-जूनमध्ये टीसीएसचा निव्वळ नफा ६ टक्क्यांनी वाढला

**मुंबई :** देशातील सर्वात मोठी आयटी सेवा कंपनी टीसीएसने गुरुवारी जून तिमाहीत निव्वळ नफ्यात ६ टक्क्यांनी वाढ होऊन १२,७६० कोटी रुपये झाल्याचे जाहीर केले. टाटा समूहाच्या कंपनीने गेल्या वर्षी याच कालावधीत १२,०४० कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळवला होता.

कंपनीचा महसूल १.३ टक्क्यांनी वाढून ६३,४३७ कोटी रुपयांवर पोहोचला आहे, जो मागील वर्षीच्या याच कालावधीतील ६२,६१३ कोटी रुपयांवरून आला होता, परंतु स्थिर चलनाच्या दृष्टिकोनातून तो ३ टक्क्यांनी कमी झाला आहे.

कंपनीच्या निवेदनानुसार, एप्रिल-जून कालावधीत तिचा ऑपरेटिंग नफा तिमाहीच्या तुलनेत ०.३० टक्क्यांनी वाढून २४.५ टक्क्यांवर पोहोचला आहे. जागतिक स्तरावरील आर्थिक आणि भू-राजकीय अनिश्चिततेमुळे मागणीत घट झाली, असे कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी के. कृतिवासन म्हणाले.

### नोबेल हायजिनचे मुख्य वित्त अधिकारी निखिल दाते यांचे मत

## पीएलआय योजना वस्त्रोद्योगासाठी लाभदायी

**मुंबई :** २०२१ मध्ये सुरू करण्यात आलेली वस्त्रोद्योगासाठी उत्पादन आधारित प्रोत्साहन (पीएलआय) योजना भारताच्या वस्त्रोद्योगासाठी एक क्रांतिकारी बदल घडवणारी योजना ठरली आहे. २४ सप्टेंबर २०२१ पासून ३१ मार्च २०३० पर्यंत लागू असलेली ही योजना मॅनमेड फायबर (MMF) कपडे, कापड आणि तांत्रिक वस्त्रांच्या उत्पादनाला चालना देण्यासाठी पाच वर्षांसाठी आर्थिक प्रोत्साहन देते. त्यामुळे उत्पादनात वाढ, स्पर्धात्मकता आणि जागतिक पातळीवर समाकलन साधले जात आहे.



२० फेब्रुवारी २०२५ रोजी एक महत्त्वाचा निर्णय घेऊन मंत्रालयाने ५४ कोटींचे प्रारंभिक अनुदान वितरीत करण्यास मान्यता दिली. या योजनेंतर्गत किमान गुंतवणूक मर्यादा १०० कोटी (भाग १) आणि ३०० कोटी (भाग २) इतकी आहे. प्रोत्साहन रक्कम ही मागील वर्षाच्या तुलनेत किमान २५ टक्के उलाढाल वाढ साधल्यावरच दिली जाते.

"पीएलआय योजनेच्या सहाय्यामुळे आम्हाला स्वयंचलन, उत्पादन विकास, क्षमता वाढ व रोजगार निर्मिती यामध्ये गुंतवणूक गतीने करता आली," असे नोबेल हायजिन प्रा. लि. चे मुख्य वित्त अधिकारी निखिल दाते यांनी सांगितले.

"या योजनेने तांत्रिक वस्त्रे व मॅनमेड फायबर वस्त्रांच्या क्षमतेला योग्य प्रकारे ओळख दिली आहे व त्यांच्या अनेक उत्पादनांना योजनेत सामावून घेतले आहे," असे मत मॅटेक्सिल (मॅनमेड अँड टेक्निकल टेक्सटाइल्स एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिल) चे अध्यक्ष शालीन तोशनीवाल यांनी मांडले. ही परिषद या क्षेत्रातील निर्यात वाढीसाठी नियुक्त अधिकृत संस्था आहे.

प्रोत्साहनाची रक्कम पाच आर्थिक वर्षांमध्ये (वित्त वर्ष २०२५-२६ ते २०२९-३०) वितरीत केली जाईल, जी वित्त वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या काळातील कामगिरीवर आधारित असेल. या योजनेसाठी एकूण १०,६८३ कोटींचा अर्थसंकल्पीय निधी निश्चित करण्यात आला आहे.



## गुरु म्हणजे अंधकाराकडून प्रकाशाकडे नेणारा दीपस्तंभ, ज्ञान, संस्कार आणि प्रेरणेचा अमूल्य स्त्रोत

**दैनिक युवक आधार**
**- रिसोड प्रतिनिधी**
**. रणजीत ठाकूर.**
**प्राचार्या मंजुषा सु.देशमुख मॅडम**
**(स्थानिक रिसोड )-** भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे गुरुपौर्णिमा मोठ्या हर्षउल्लासात साजरी करत असताना प्रथमतः प्राचार्या सन्माननीय मंजुषा सु. देशमुख मॅडम व पर्यवेक्षक आदरणीय सुनील डाहाळके सर व विचार मंचावरील मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थिनीनि उत्कृष्ट्यरित्या गुरुपौर्णिमेनिमित्त नाट्य सादरीकरण करत गीत ,पोवाडे यांच्या माध्यमातून गुरूंची महती गायली.कार्यक्रमाच्या अध्यक्षा धनश्री कौटकर, उपाध्यक्ष सैजल टीकाईत, प्रमुख पाहुणे प्रशंशा साळवे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना त्या म्हणाल्या की आमच्या जीवनातील प्रवासात आयुष्यात आलेली प्रत्येक प्रिय व्यक्ती ही गुरुचे असते. गुरु म्हणजे जीवनाला दिशा देणारा सत्याचा प्रवक्ता होय. असे आपल्या मनोगतातून विचार व्यक्त केले. श्वेता कोटकर, प्रिया खोडके, श्रुती मानवतकर, आपूर्वा मोरे, संस्कृती पावडे इत्यादी विद्यार्थ्यांनीनि आपले मनोगत व्यक्त करताना गुरु पोर्णिमा म्हणजे जीवनातील सर्वात महत्वाच्या व्यक्तीला गुरुंना वंदन अथवा नमन करण्याचा पवित्र दिवस. म्हणजे जगाची माऊली सुखाची सुंदर सावलीअसे मत व्यक्त केली. काही विद्यार्थिनी गीत, कविता ,चारोळीच्या माध्यमातून गुरूंच्या कार्य आणि कर्तृत्वावर प्रकाश टाकला त्यामध्ये प्रिया मोरे, देवयानी गुंजकर, श्रद्धा लिंगे, माधवी मगर, ईश्वरी खोडे, प्रशंशः साळवे, कीर्ती देशमुख इत्यादींनी समधूर स्वरामध्ये गीत कविता आणि चारोळ्या गायल्या. ज्येष्ठ शिक्षिका मंगला शेटे मॅडम, आर.बी. देशमुख सर, प्रा. ज्ञानेश्वर भुतेकर यांनी गुरु शिष्यांच्या परंपरेवर प्रकाश टाकला. तसेच सन्माननीय पर्यवेक्षक सुनील डहाळके सर यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगत असताना प्राचीन काळापासून तर आधुनिक काळापर्यंत ही गुरुमपरंपरा चालत आलेली आहे .शिषाच्या जीवनामध्ये गुरूंचे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे असे सूचक विधान आपल्या मनोगतुन व्यक्त केले. शेवटी महाविद्यालयाच्या प्राचार्या आदरणीय मंजुषा सु. देशमुख मॅडम गुरुपरंपरेची महती सांगत असताना गुरु म्हणजे अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारा दिपस्तंभ होय. गुरु शिवाय ज्ञान नाही, ज्ञानाशिवाय आत्मा नाही, ध्यान नाही, धैर्य आणि कर्म नाही ही सगळी गुरुची देण आहे. या शब्दात गुरुपौर्णिमेचे महत्त्व अनन्य साधारण असे आपल्या प्रमुख मार्गदर्शनातून सानगितले. या कार्यक्रमाची नियोजन व आयोजन कू. प्रांजली लव्हडे मॅडम, व कु.मैथिली छत्रे मॅडम यांनी केले.कार्यक्रमाचे लक्ष्मी गवळी व आभार प्रदर्शन दिव्या देशमुख हीने केले.

## 'आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा' प्रत्येक विद्यार्थ्याला व्यक्त होण्याची संधी - नितेश पाटील

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**
कोशिश फाऊंडेशन आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली 'आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा' प्रत्येक विद्यार्थ्याला व्यक्त होण्याची आणि त्यातून वक्तृत्व शैली शिकण्याची संधी आहे, असे प्रतिपादन भारतीय युवा मोर्चाचे खारघर शहर अध्यक्ष नितेश पाटील यांनी केले.

महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या कोशिश फाऊंडेशन आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेच्या वर्ग अंतर्गत फेऱ्या खारघर मधील विद्यालयात झाल्या. त्या अनुषंगाने ते बोलत होते.





पनवेल महापालिका क्षेत्रातील शाळांमध्ये कोशिश फाउंडेशनच्या वक्तृत्व स्पर्धेला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या कोशिश फाउंडेशनने महापालिकेच्या सोबतीने या उपक्रमाचे चांगल्या प्रकारे आयोजन केले आहे. ही स्पर्धा टॅलेंट हंट किंवा केवळ स्पर्धा नाही. तर मुख्य उद्देश प्रत्येक विद्यार्थ्याला व्यासपीठ मिळवून देणं आहे. अनेक वेळा आपण स्वतःला जे हवं आहे ते योग्य पद्धतीने मांडू शकत नाही, त्यामुळे आपल्या जीवनात संधी गमावल्या जातात. आपली भूमिका, आपले विचार प्रभावीपणे मांडणं खूप महत्त्वाचं आहे. ही कला लहान वयातच शिकली पाहिजे, यासाठी ही स्पर्धा आहे. विद्यार्थ्यांमध्ये केवळ भाषणच नाही, तर स्वतःच्या व्यक्तिमत्व विकासाची जाणीव निर्माण केली आहे. १७ हजार विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी करून घेण्यात आले असून, थेट वर्गात विद्यार्थ्यांना बोलण्यास प्रोत्साहन दिले जात आहे. यामुळे विद्यार्थी भीती झटकत, आत्मविश्वासाने व्यक्त होत आहेत. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या मनात सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून, हा उपक्रम केवळ आजचा नसून त्यांच्या जीवनभर काम येणाऱ्या कौशल्यांचा पाया घालत आहे, असेही नितेश पाटील यांनी म्हंटले.

## गणेश भक्तांसाठी आनंदाची बातमी : गणेशोत्सव आता 'राज्याचा महोत्सव.'

### सांस्कृतिक मंत्री अशिष शेलारांची घोषणा.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**
गणपती उत्सव म्हणजेच गणेश चतुर्थी हा महाराष्ट्रात मोठ्या व उत्साहात आणि भक्ती भावाने साजरा होणारा एक महत्त्वाचा हिंदू सण आहे हा उत्सव भगवान श्री गणेशाच्या जन्मदिनी चतुर्थीच्या दिवशी साजरा केला जातो जो भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षाच्या चौथ्या दिवशी येतो गणपती उत्सव दहा दिवसांचा असतो ज्यामध्ये गणेश मूर्तींची प्रतिष्ठापना केली जाते. त्याची मनोभावे पूजा केली जाते हा गणपती उत्सव सार्वजनिक आणि घरगुती स्तरावर मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो या उत्सवा द्वारे सांस्कृतिक आणि सामाजिक एकोपा वाढतो.

गणेशोत्सव महाराष्ट्रात एक मोठा सण असल्याने या दिवसांमध्ये शहरांमध्ये आणि गावांमध्ये उत्साहाचे वातावरण असते सार्वजनिक ठिकाणी गणेश मंडळी विविध कार्यक्रमा आयोजित करतात सांस्कृतिक, स्पर्धा, सामाजिक उपक्रम यासारखे कार्यक्रम साजरे केले जातात.



अशा लाडक्या गणरायाच्या आगमन २७ जुलै रोजी होणार आहे या पार्श्वभूमीवर गणेश भक्तांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे यापुढे गणेशोत्सव हा' राज्याचा महोत्सव' म्हणून साजरा केला जाईल अशी घोषणा संस्कृतीक मंत्री आशिष शेलार यांनी विधिमंडळात केली आहे लाडक्या गणरायाचा उत्सव म्हणजे राज्याच्या गौरव आणि अभिमान असलेला उत्सव आहे त्यामुळे आता हा सण अधिकृतपणे महाराष्ट्राचा महोत्सव म्हणून साजरा केला जाईल.